REGISTERED NO. 7, 1876

# वऱ्हाडसमाचार.

पुस्तक १० अकोला, रविवार ता० १९ माहे मार्च सन १८७६ इ० अंक १२

## वऱ्हाडसमाचाराचीकिंमत

| | |
|---|---|
| वर्षाचे आगाऊ | ५ |
| ताखेर | ७ |
| फुटकळ अंकास | ०४ |
| डाकहाशील | |
| वर्षाचे आगाऊ | १०८ |
| " आखेर | २ |

नवीन वर्गणीदार होऊ इच्छिणारे लोकांकडून आगाऊ वर्गणी यावी ह्मणजे पत्र सुरू केलें जाईल.

## नोटिसीबद्दल.

| | |
|---|---|
| मराठी, दर ओळीस | ०१८६ |
| तीच नोटिस दुसरे खेपेस | ०१ |
| इंग्लिश लिपींत दर ओळीस | ०४ |
| ,, दुसरे खेपेस | ०२ |

## नोटिसा.

लक्ष्मण वलद एकोजी न्हावी रहाणार गायगाव तालुके बाळापुर यास शिवराम गव्ह्याजी कुळकर्णी रहाणार पारस याजकडून नोटिस देण्यांत येतें कीं तुह्माकडे खातेबाकीवरून ३९ रुपये मुद्दल व शिवाय व्याज घेणें आहे ती रकम नोटिस पोंचल्यापासून ८ दिवसांत पाठवून द्यावी. नाहींपेक्षां तुह्मावर दिवाणी कोर्टांत दावा करून खर्चासुद्धां सर्व पैसा भरून घेतला जाईल. कळावें. तारीख १३ माहे मार्च सन १८७६ इसवी.

( सही ) शिवराम गव्ह्याजी कुळकर्णी
दस्तुर चंदूजी गुमास्ते

नोटिस

शिताराम वलद रतीराम पारधी रहाणार गायगाव तालुके बाळापुर यास शिवराम गव्ह्याजी कुळकर्णी रहाणार पारस याजकडून नोटिस देण्यांत येतें कीं तुह्माकडे खातेबाकी वरून मुद्दल रुपये ९० शिवाय व्याज घेणें आहे ते न दिल्यामुळें नोटिस केली आहे तर नोटिस पावल्यापासून ८ दिवसांत रकमेची आदाई करावी. नाहींपेक्षां दिवाणींत दावा करून खर्चासुद्धां सर्व पैसा घेतला जाईल. कळावें तारीख १३ मार्च सन १८७६ इसवी.

[ सही ] शिवराम गव्ह्याजी कुळकर्णी
दस्तुर चंदोजी गुमास्ते

नोटिस

सनईराम रामदत्त मारवाडी वस्ती कसबे अकोट तालुके मजकूर यांस खालीं सही करणार याजकडून नोटिस देण्यांत येतें कीं तुह्मी तारीख २२ फेब्रुवारी सन मजकुरची नोटिस दिली त्याचें उत्तर देण्यांत येतें कीं तीन वर्षां पूर्वीं मी तुमचे दुकानावर नोकर होतों आणि नोकरी सोडली ते वेळेस तुमची बाकी मजकडेस काहीं निघाली नसून नंतरही तुमचे माझे देणें घेणें झालें नाहीं आणि मी तुमचे दुकानावर कधीं हिशेब रुजू केला नाहीं मग टिकिट लावून सही कशाची करून देऊं मुळींच तुमचें मजकडेस कांहीं नाहीं. कळावें तारीख ४ मार्च सन १८७६ इसवी.

( सही ) गंगाराम वल्लद रामसिंग
रजपूत दस्तुर खुद.

नोटिस

हसनखा जात मुसलमान रहाणार कुरनखेड पैलपाडें तालुके अकोले यास चांदबी मर्द महमद फाजल जात मुसलमान हैदराबाद कॉंटिंजेन्ट साकिन तलेरी हल्लीं रहाणार वल्लद इजकडून नोटिस देण्यांत येतें कीं माझी मुलगी नामे रहेमानबी तुजला लग्नानें दिली असून तूं हल्लीं ३ वर्षें झालीं परंतु आपले घरीं घेऊन गेला नाहींस ह्मणून तुजला आह्मी किती एक वेळ नेण्यास्तव समज दिली असून पंचानींही समज दिली परंतु नेलें नाहीं यास्तव तुजला नोटिशीनें कळविण्यांत येतें कीं लग्नाचा खर्च झालेला ६० रुपये व माझे घरीं तीन वर्षें असल्यामुळें पोटखर्च व कपडे वगैरे मिळून १२० रुपये एकूण १८० रुपये खर्च झाले ते आज तारखेपासून १० दिवसाचे आंत सदहू खर्च झालेले रुपये आह्मास देऊन आपले औरतीस घेऊन जावें १० दिवसांचे आंत रुपये देऊन आपले औरतीस जर न नेलें तर तिचें दुसरे मनुष्याशीं कायदेशीर लग्न लावून देऊं नंतर तुमचा कांहीं वारसा रहाणार नाहीं. जर तुह्मी सदहू मुदतींत येऊन तुह्माकडून होत असल्यास तजबीज करावी १० दिवसानंतर जरी आले तरी तुमचा कांहीं हक्क चालणार नाहीं. कळावें तारीख १० मार्च सन १८७६ इसवी.

[ सही ] चांदबी मर्द महंमद फाजल
निशाणी हातची बांगडी

## पत्रव्यवहार

या सदराखालील मजकूर पत्रकर्त्यांच्या मतास मिळूनच असतील असें समजूं नये.

### माना ऊर्फ मणिपुर.

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांस

वि. वि. प्राचीन काळीं बब्रुवाहन ह्मणून मोठा विख्यात राजा होऊन गेला. त्याचें जें राजधानी शहर मणिपुर तें हल्लीं ज्यास मानें असें ह्मणतात तें असावें असा कित्येकांचा समज आहे. व कांहीं "ब्रह्मदेशांतील काचार प्रांतांत जें मणिपुर ह्मणून शहर आहे तेंच तें बब्रुवाहनाचें मणिपुर" असें ह्मणतात. असा मतभेद असल्यामुळें माना या गांवच्या प्राचीन काळच्या संबंधाच्या ज्या गोष्टी कळतात त्या निर्णयाकरितां आह्मी लोकांपुढें ठेवितों.

सृष्टीची रचना करणारा मोठा वस्ताद आहे, त्याच्या घडामोडीचें व अपार चातुर्याचें ज्ञान कोणासही होणें न हीं. आह्मा मानवी प्राण्यांचें एवढेंच काम आहे कीं, तो ठेवील त्या स्थितींत राहून कालक्षेप करावा. कोणतीही वस्तु एकाच स्थितींत राहील असा नियम नाहीं, मोठमोठीं शहरें प्राचीन काळीं गजांत लक्ष्मीच्या भारानें डुलत होतीं; ज्यांतील रहाणाऱ्यांच्या शौर्याची सर्वत्र कीर्ति होती; तींच आतां अगदीं धुळीस मिळावयास झालीं आहेत. आह्मी हल्लीं ज्या गावाबद्दल लिहिण्याचें मनांत आणलें आहे तें प्राचीन काळीं मोठें विस्तृत व धनाढ्य नगर होतें. जितके जितके हिंदु ह्मणून आहेत त्यांनीं त्यांनीं भारतांतील पौराणीक कथा वाचल्या अगर निदान ऐकल्या तरी असतील. कौरव पांडवांच्या लढायींतील प्रख्यात योद्धा जो अर्जुन त्याचा पुत्र बब्रुवाहन याचें हें राजधानीचें नगर होतें. या ठिकाणीं बापा लेकांची ( अर्जुन आणि बब्रुवाहन यांची ) प्रख्यात लढाई झाली. त्यावेळेस अर्जुनाचा पुतण्या चंद्रकेतु व बब्रुवाहन या दोघांचें तुमुल रण चाललें असतां चंद्रकेतूनें रागाच्या आवेशांत बब्रुवाहनाचें नगर ( मणिपूर ) पालथें घातलें. त्याची हल्लीं या ठिकाणीं साक्षा आढळते. येथें गावाच्या नजीकच अगदीं उत्तरेकडील बाजूला एक ओसाड भाग आहे त्याला जुना माना ह्मणतात. त्या ठिकाणीं खणलें असतां उलल्या वस्तू आढळतात. प्राचीन काळीं हें गाव किती मोठें होतें हें सांगत बसण्यापेक्षां या बद्दलची जी ह्मण हल्लीं प्रचारांत आहे ती सांगतों ह्मणजे इजवरून वाचकांच्या चांगलें लक्षांत येईल 'मनम्याचें गोठाण, माहूरचा चारा आणि गंगेचें पाणी' ह्मणजे हें गाव इतकें मोठें होतें कीं एथून मनभें ह्मणून १२ कोसांवर गाव आहे त्या ठिकाणीं या गावचें गोठाण होतें व माहूर ह्मणून ४० कोसांवर गाव आहे तेथील जंगलांत या गावचीं गुरें चरावयास जात असत व पाणी पिण्याला गंगेवर जात असत ( ही गंगा हल्लीं जिला बाणगंगा ह्मणतात ती असावी असें वाटतें ) यावरून हें गाव केवढें मोठें होतें याबद्दल आमचे वाचक विच्यार करतील. पूर्वीच्या लोकांबद्दल एथें एक चमत्कारिक गोष्ट ऐकू येते ती अशी कीं एका मनुष्याच्या शरीराचा पायापासून ढोपरापर्यंत एक भाग राहिला होता त्याचें एका इसमाच्या घराला आढें झालें. कसें जरी घर झटलें तरी त्या च्या आढ्याचें लाकूड निदान ४ हात तरी असलें पाहिजे. जर पायापासून गुढग्यापर्यंतचा भाग इतका मोठा होता तर तो पुरुष किती मोठा असावा बरें? येथें एक जुना किल्ला आहे त्यांत एक विहीर आहे. खिणखिणी ह्मणून दोन कोसांवर गाव आहे त्यांत एक उत्तम शिवाचें देवालय आहे. यांतील खांब व त्यांवर काढलेली अत्युत्तम नक्षी हीं पहाण्यामाफक आहेत. हें देऊळ विश्वकर्म्यानें एका रात्रींत निर्माण केलें अशी दंतकथा सांगतात. त्या देवाच्या पूजेकरितां नित्य जाण्याचा बब्रुवाहनाचा मार्ग किल्ल्यांतील विहिरींतून होता असें ह्मणतात. फार दिवसांपूर्वीं नव्हे अगदीं अलीकडे त्या विहिरींत कांहीं फुलें टाकलीं तीं खिणखिणीच्या विहिरींत निघालीं. प्राचीन काळीं ज्या भयंकर राज्य करण्याच्या रीति होत्या त्याचें एक उत्तम उदाहरण आम्ही येथें लिहितों. पण याच्या खरेपणाबद्दल आह्मास अभाव आहे. पूर्वीं ज्या वेळेस एथील गढीचें काम चाललें होतें तेव्हां पहिला बुरूज कांहीं केल्या तयार होईना, इतक्यांत तेथें कोणी अशी कल्पना काढिली कीं येथें मोठें देवस्थान आहे त्यास माणसाचा बळी पाहिजे. अशी शंका निघाल्यावर तेथें काय उशीर! आणली दोन लमाणांची स्त्रीपुरुषें पकडून. आणि त्याच्या कपाळीं कुंकू व भंडारा लावून त्यास त्या यमरूपी बुरुजांत टाकिलें गाडून. हर हर!!! काय ही भयंकर स्थिति? परमेश्वरा असल्या क्रूर राज्यांत कोणासही उत्पन्न करूं नको. याप्रमाणें प्राचीन हकीकत झाली आतां थोडीशी हल्लींच्या गावची हकीकत देऊन हें वर्णन पुरें करितों.

हा गाव उंचवट्यावर वसलेला असल्यामुळें अगदीं रुक्ष दिसतो. वस्ती सुमार ६०० घरांची आहे त्यांत २०० मुसलमान व बाकी हिंदु आहेत. या गावचा नदीकडील भाग बराच रमणीय दिसतो. या नदीचें नाव उमा, इच्या नावाच्या संथपणाप्रमाणेंच इचा प्रवाह एथें आहे. इचा उगम एथून अगदीं जवळ ह्मणजे दहा कोसांवर असून या ठिकाणीं इचें पात्र फारच रुंद झालें आहे. या नदीवर जो रेलवेचा मोठा टोलेजंग पूल बांधला आहे त्यामुळें व नदीवरील एकंदर देखाव्यामुळें हा भाग रमणीय झालेला आहे. गावांत २ सरकारी शाळा आहेत एक मराठी व दुसरी हिंदुस्थानी. मराठी शाळेची इमारत इंजिनियर मार्फत उत्तम तऱ्हेनें बांधलेली आहे. गावाच्या मध्यभागीं औटपोष्ट आहे. एकंदरीच्या मानानें हा गाव सुखवस्तु रहाण्यास फार उत्तम आहे. पूर्वींच्या वैभवाची हलकी सालकीसुद्धां कांहीं खूण दिसत नाहीं याचें मोठें नवल वाटतें. याप्रमाणें हकीकत लोकांपुढें ठेविली आहे. तरी यांतून खरें मणिपुर कोणतें याजबद्दल आपण अगर आपले वाचक निकाल करतील अशी आशा आहे. तारीख १२ मार्च सन १८७६ इसवी.

एक शाकित
स

**माफी**—गेल्या आठवड्यांत शिमग्याच्या सुटींत आमचें वर्तमानपत्र निघालें नाहीं, व पहिल्यानें न निघावें असा बेत नव्हता ह्मणून पूर्व विंनती केली नव्हती परंतु आयते वेळेस नोकरांच्या, कारखान्याच्या, व खासगीच्या कांहीं विशेष गैरसोयींमुळें अंक निघाला नाहीं याबद्दल माफी मागतों.

ए. व. स.

## वसूल

| | रु |
|---|---|
| रा. शामराव सदाशिव स्टांपवेंडर | ६०८ |
| मि० अबासबेग इनामदार | ७ |
| रा. केशव लक्ष्मण जोरवेकर | ५ |
| मे० बेल साहिब डिपुटी कमिशनर | २६ |
| रा. चिंधाजी वल्लद जानजी पाटील | ६०८ |
| श्री. रा. आपासाहेब पटवर्धन | ६०८ |
| मि. बिलदखा हबीबखा मक्तेदार | ९०१५ |
| रा. अमृतराव दत्ताजी देशमुख | १७ |
| रा. मुकुंदराव नंदाजी देशमुख | २५०१२ |
| ,, दानाजी पाटील पुनोतीकर | ८०५०४ |
| ,, पांडुरंग अनंत दांडेकर मास्तर | ५ |
| उमरावती लायब्ररी | १०१० |
| रा. रा. सखाराम दत्तात्रय तहशिलदार | १० |
| ,, ,, नारायण प्रभाकर परांजपे | ६०८ |
| रा. हरबाजी सखाराम जळगावनाटे | ६०८ |

## वऱ्हाडसमाचार

मिती फाल्गुन वद्य ९ शके १७९७.

## राणी साहेबांस एक नवी पदवी.

आमच्या देशाला पुष्कळ वर्षांपासून प्रभुत्व इंग्लिश सरकारचें आहे. प्रथम त्याच सरकारच्या हुकुमानें आमचा देश एका ईस्ट इंडिया नावाच्या व्यापारी कंपनीच्या ताब्यांत होता तो सन १८५९ साली महाराणी साहेबांनीं आपले खास दिमतीस घेतला. तेव्हां हिंदुस्थान संबंधानें त्यांनीं आपणास कांहीं किताब धारण करावयाचा तो दुर्लक्षानें राहून गेला. सबब आतां घ्यावा अशी महाराणी साहेबांस इच्छा झाली व ती त्यांनीं पार्लमेंट सभेस विदित केली. त्यावरून "हिंदुस्थानच्या बादशाहीण" असा किताब महाराणी साहेबांस असावा असा कायद्याचा मसुदा झाला व तो दोन वेळा वाचला गेला. आतां तिसऱ्यानें वाचून लवकरच ती पदवी ठरली जाऊन जाहिरनामे प्रसिद्ध होतील.

महाराणी साहेबांचे ज्येष्ठ चिरंजीव हिंदुस्थानांत आले त्यांचा सर्वत्र गौरव, आदर, व उत्साह झाला. साऱ्या हिंदुस्थानची प्रजा, जहागिरदार, संस्थानिक, राजे, महाराजे इत्यादि सर्व एकनिष्ठ भावानें महाराणी साहेबांच्या चिरंजिवाचा आदर करण्यास तत्पर होते व त्यांनीं तो मनोभावें केला आणि नजराणा रूपानें महाराणी साहेबांच्या घरीं वित्तही बहुत पाठविलें तो सर्व प्रकार मनांत आणून महाराणी साहेबांनीं हिंदुस्थान देशाची विशेष कळकळ मनांत आणून या देशास कांहीं अधिक हक्क देतां यावे व याचें सौख्य वाढवावें या उद्देशानें ही महान पदवी धारण करण्याचें मनांत आणिलें आहे अशी, आह्मी कल्पना करीत होतों. परंतु पार्लमेंट सभेंत झालेल्या वादविवादाच्या रोखावरून तसें समजण्यास कांहीं कारण आहे असें दिसत नाहीं.

वास्तवीक रीतीनें पाहिलें असतां अधिक किताब धारण केल्यानें आमचे देशाला कांहीं सुख किंवा सोय वाढत नाहीं तर ही महत्पदवी न घेतल्यानेंही महाराणी साहेबांविषयींची इकडील लोकांची महत्व बुद्धि तिळमात्र कमी होण्यास कांहीं कारण नव्हतें. आमचे लोक राणी साहेबांना जो मान देताहेत तो महाराजाधिराज, हिंदु पदबादशाह, किंवा केवळ ईश्वरप्रतिमा यांना द्यावा इतक्या योग्यतेचा आहे. आमचे राजे रजवाडे ज्यांच्या पूर्वजांनीं मोठमोठालीं वैभवें भोगिलीं व त्यांचें स्मरण ज्यांच्या चित्तांत नित्य जागरूक आहे ते देखील राणी साहेबांच्या चिरंजिवास उच्च सिंव्हासनावर बसवून आपण अधःप्रदेशीं बसत आहेत. मग अधिक पदवीनें याहून अधिक महत्व तें कोणतें अपेक्षाव याचें आहे? अस्तु.

या अशा महत्पद धारणाच्या कायद्याबरोबरच पार्लमेंटांत हिंदुस्थानचे सभासद घेण्याचा, हिंदुस्थानचे कला कौशल्यास उत्तेजन देण्याचा वगैरे कायदे करण्याविषयीं महाराणी साहेबांनीं आपली इच्छा प्रदर्शित केली असती तर तें देखील कायदे सहज झाले असते. पण आमचें दुर्दैव केवढें जबरदस्त कीं तें त्यांस तशी इच्छाच होऊं देत नाहीं!

## कित्येक नेटिवांची इंग्लिशांविषयीं खोटी द्वेषबुद्धि.

(Communicated.)

श्लोक

प्रजानामेवभूत्यर्थंसताभ्योवलिमग्रहीत् ॥
सहस्रगुणमुत्स्रष्टुमादत्तेहिरसंरविः ॥ १ ॥
तस्यसंवृत्तमंत्रस्यगूढाकारेंगितस्यच ॥
फलानुमेयाःप्रारंभाःसंस्काराःप्राक्तनाइव ॥२
प्रजानांविनयाधानात्रक्षणादभरणादपि ॥
सपितापितरस्तासांकेवलंजन्महेतवः ॥ ३ ॥
स्थित्यैदण्डयतोदण्डान्परिणेतुःप्रसूतये।
अप्यर्थकामौतस्यास्तांधर्मएवमनीषिणः ।४।

वर लिहिलेल्या चार अनुष्टुपच्छन्दांत राजाचे मुख्य मुख्य धर्म सांगितले आहेत. एखादा देश जेव्हां राजसत्तेत असतो, तेव्हां त्या राजाच्या अंगीं वर सांगितलेले गुण असले पाहिंजेत. आमच्या वाचकांपैकीं कित्येकांस संस्कृत समजत नसेल ह्मणून आह्मी वरील श्लोकांचा थोडक्यांत अर्थ सांगतों:—

राजानें प्रजेकडून जो कर घ्यावयाचा तो फक्त तिचें कल्याण करण्याकरितांच घ्यावा. ज्याप्रमाणें सूर्य समुद्रादि जलाशयांचें पाणी शोषून घेऊन दसपट चांगलें पाणी त्यांस परत देतो. ( उन्हाळ्यामध्यें समुद्राच्या व इतर ठिकाणच्या पाण्याची वाफ होऊन आकाशांत जाते व कर्क संक्रांत होऊन सूर्याचो दिशा फिरली ह्मणजे या वाफेस गारवा लागूं लागतो व त्यामुळें इंच पाणी होऊन पाऊस रूपानें पृथ्वीवर पडतें. कित्येक वेळा या वाफेस आकाशांत अतिशय गारवा लागल्यामुळें पाणी अगदीं थिजून जाऊन गारांच्या रूपानें पृथ्वीवर पडतें. पण अशी स्थिति उष्ण कटिबंधांत असणाऱ्या देशांत फार वेळ घडत नाहीं. ) ( २ ) ज्याप्रमाणें मनुष्याची सांप्रत स्थिति अवलोकन करून अन्य जन्मीं त्यानें आचरिलेल्या पापपुण्याची कल्पना करितां येते तद्वत् राजदरबारीं होणारे बेत अगदीं गुप्त रहावेत, राजाच्या मुखचर्येवरून किंवा दुसऱ्या कोणत्याही चिन्हांनीं फुटूं नयेत त्यांचा फुटण्याचा योग्य काल झटला ह्मणजे ते उपयोगांत आणून दाखविणें हा होय. ( ३ ) लोकांना सदाचारी ठेवून त्यांचें संरक्षण करून त्यांची सुस्थिति ठेवून राजाला "प्रजेचा पिता" असें नांव मिळतें. आणि तें फारच चांगलें कारण इतर पिते केवळ जन्म देणारेच काय ते असतात. ( ४ ) राज्याची सुस्थिति करण्याकरितां किंवा राज्यांत शांतता राखण्याकरितांच जो दण्ड करितो व केवळ संतानप्राप्तिकारितांच विवाह करितो, असा शहाणा राजा अर्थ आणि काम असे आपले दोन हेतू धर्मानेंच संपादितो यांत संशय नाहीं. मनुष्याला या जगांत धर्म, अर्थ आणि काम अशा तीन गोष्टी साधावयाच्या असतात, राजानें दुसऱ्या दोन साधिल्या कीं पहिली सहजगत्या साधिली जाते.

ही राजसत्तात्मक राज्याची गोष्ट झाली आह्मी मागल्या खेपेस या विषयावर लिहितांना सध्याच्या स्थितीप्रमाणें राज्यांत उत्तम राज्य कोणच्या प्रकारचें असतें हें सकारण दाखविलें आहे. व तशी राज्यव्यवस्था पेशवाईमध्यें नसल्या कारणानें सर्व लोकांस सुख होत नसे यांत मोठेंसें नवल नाहीं. क्षणभर आपल्यावर परराज्याचा बोजा नाहीं असें समजून विचार करण्यास लागू या, आणि या विचारांतीं आपणास कळून येईल कीं, सध्याचें राज्य पेशवाईपेक्षां सातपट चांगलें आहे. आतां कांहीं कांहीं लोकांच्या मनाची स्थिति कांहीं विलक्षण प्रकारची होऊं लागली आहे. त्यांस वाटतें इंग्लिश लोकांनीं आह्मांस जिंकिलें व ते आतां आह्मांवर राज्य करिताहेत व आह्मांस त्यांच्या ताब्यांत दिवस काढावे लागताहेत व यामुळें पेशवाईंत असणाऱ्या स्वातंत्र्यापासून होणारीं कित्येक सुखें आह्मांस पूर्णपणें उपभोगण्यास सांपडत नाहींत. पण त्यांनीं इतका विच्यार करावा कीं, इंग्रज लोकांनीं त्या सुखांची आह्मांला आठवण न होऊं देण्याकरितां दुसऱ्या पुष्कळ चांगल्या गोष्टी आपल्या बरोबर येथें आणून त्यांचे वाटेकरी आह्मांस केलें आहे. व त्याबद्दल आह्मांस त्यांचे फारच आभारी असलें पाहिजे. पूर्वीं रोमन लोकांनीं अनेक ठिकाणीं जय मिळविले व जित शत्रूंना दासानुदास करून टाकिलें त्याप्रमाणें यानीं आपणास करून टाकिलें असतें तर आपण काय केलें असतें? इंग्लिश लोकांनीं आमचीं मनेंच अगदीं बदलून टाकिलीं आहेत असें ह्मणण्यास हरकत नाहीं. त्यांच्या संमतीनें ज्या सुखांची आपणास चव लागली आहे व लागत आहे तीं सुखें एशिया खंडांतील इतर राष्ट्रांत आणखी शेंकडों वर्षें गेलीं तरी माहित होणार नाहींत. वर्तमानपत्रें छापणें, मासिक पुस्तकें छापणें, राज्य संबंधीं, धर्म संबंधीं सभा भरविणें, वक्तृत्वाच्या सभा, पाठशाळा, इतर भाषांचा अभ्यास करून त्यांतील रस आपल्या भाषांत आणणें, भाषांतरें करणें, कला कौशल्याचा उद्धार, रसायन शास्त्र, वैद्य शास्त्र, मनुष्याचें व इतर प्राण्यांचें शरीर कापण्याची विद्या, ज्योतिःशास्त्राचें वगैरे ज्ञान, यांत्रिक विद्या, आगगाड्या चालविणें, तारायंत्रांतून बातम्या धाडणें, यंत्रावर कापसांचे गंठ्ठ बांधणें व वस्त्र काढणें इत्यादि मनुष्याच्या सुधारणेच्या गोष्टी त्यांनींच आमच्या देशांत आणिल्या, व त्याच्यामुळें आह्मी त्यांचा अनुभव घेऊं लागलों आहों. सभा भरून निरनिराळ्या विषयावर संभाषण करणें, पुस्तकालयामधून संध्याकाळच्या सुमारास पुस्तकें व वर्तमानपत्रें वाचित बसणें, सुबक आणि उत्तम सडकांनीं सूर्यास्ताच्या सुमारास हवा घेण्यास जाणें, बागांतून हिंडणें वगैरे गोष्टींपासून होणारीं सुखें आतां ज्याप्रमाणें श्रीमंतापासून गरिबापर्यंत, व थोरापासून लहानापर्यंत निशंःकपणें घेण्याला सांपडतात, त्याप्रमाणें तीं पूर्वीं मिळत नसत. आह्मी कबूल करितों कीं पूर्वीं वैय्याकरणांच्या, नैय्यायिकांच्या व संहिता पढणारांच्या सभा असत व त्यांच्यामध्यें वादविवादही चाले, पण त्या सभांपासून भांडणारे शिवायकरून इतरांस कितपत आनंद होत असेल याची कल्पना सांप्रतकाळीं जे कांहीं थोडे बहुत नैय्यायिक, किंवा वैय्याकरणी आहेत, त्यांच्या निरर्थक वादविवादावरून करितां येते. आह्मी कबूल करितों कीं राजे लोकांच्या बागा असत व ते आपल्या स्त्रियांसह चंद्र प्रकाशांत आनंदानें क्रीडा करीत, परंतु त्यापासून प्रजेस तो नफा कोणता? मुंबईंतील सर्व संग्रहालयांतील नाना तऱ्हेच्या जिनसा पाहून होणारा आनंद, त्याच इमारतीजवळच्या किंवा पुण्यांतील बंडावरच्या किंवा आमचे अकोलें एथील टेंपलबागेमधून हिंडण्यापासून मनास वाटणारी मौजेची व आनंदाची गोडी आह्मास पेशवाई अमलांत लागण्यास किती वर्षें लागलीं असतीं बरें? केवळ बाहेरील छानछुकीवरून आह्मी या लोकांस चांगलें ह्मणतों असें नाहीं. यांनीं स्वातंत्र्याचेंही बीज आह्मामध्यें पेरिलें आहे. तें स्वातंत्र्य कोणचें, व तें आह्मास कोणत्या रीतीनें प्राप्त झालें, त्यापासून आह्मास काय नफा होत आहे, इंग्लिश लोकांची व आमची स्वातंत्र्याविषयीं काय कल्पना आहे, या गोष्टींचा पुढल्या पत्रीं विच्यार

करूं, कदाचित् कोणी असें ह्मणतील कीं "वर सांगितलेले सर्व विच्यार पोंकळ आहेत कारण त्यांपासून मोठमोठ्या शहरांत राहणारांस काय तो नफा. खेड्यापाड्यांत राहाणारे कुणबी लोकांस त्यापासून कांहीं नफा नाहीं, व त्यांची तर संख्या फार आहे." अस्तु. सध्या स्थलसंकोच्यामुळें आह्मांस या प्रश्नाचें उत्तर देण्यास सवड नाहीं. तथापि पुढल्या पत्रीं या प्रश्नाचें उत्तर देऊन, वरील गोष्टींचा विच्यार करूं, आणि पेशवाईंतील हकीकत देऊं.

## वऱ्हाड.

कर्नेल निभाडि साहेब वऱ्हाडचे कमिशनर गेल्या रविवारीं उमरावतीहून हैदराबादेकडे गेले. नवीन रेसिडेंट सर रिचर्ड मीड साहेब यांची त्यांची अजून भेट झाली नव्हती ती व्हावी हा या जाण्यांत उद्देश आहे.

सर सालरजंग हैदराबादचे दिवाण विलायतेस खास जाण्याचा निश्चय झाला असें दिसतें. पुढील महिन्याचे आरंभीं नवीन गवरनर जनरल साहेब मुंबईस येणार त्याचे पूर्वीं दिवाण साहेब मुंबईस हजर राहून त्यांची भेट घेणार व तसेच पुढें विलायतेस जाणार असें वर्तमान आहे.

सर रिचर्ड मीड साहेब हैदराबादचे रेसिडेंट यांचीं लेफटिनेंट करनलचीं बारा वर्षे पुरीं झालीं व या महिन्याचे पहिले तारखेपासून ते कर्नेल झाले.

क्या० मेकंजी साहेब उमरावतीचे डिपुटी कमिशनर यानीं तीन महिन्यांची हक्काची रजा घेतली त्यांचे जागेवर खामगावचे स्मालकाज जडज मे० लाटण साहेब यांस नेमणार.

मेजर बेल साहेब अकोल्याचे डिपुटी कमिशनर १४वे तारखेस दीड वर्षाचे रजेवर विलायतेस गेले. शहरवासी लोकांनीं ११वे तारखेस सायंकाळीं टौनहालांत त्यांस विड्यास बोलाविलें होतें तो थाट फार चांगला झाला. व कित्येक वकिलांनीं इंग्लिश, मराठी, हिंदुस्थानी भाषेंत त्यांच्या स्तावक उत्तम भाषणें केलीं.

कर्नेल बुशबी साहेब, क्या० मेकंजी साहेब, व क्या० ग्रांट साहेब अकोल्यास मेजर बेल साहेब यांस भेटण्यास आले होते.

रा. रा. माधवराव हारि सहस्त्रबुध्धे माजी क्लार्क आफ धि कोर्ट यांस बडोद्याकडे १९० रुपयाची रिविन्यु शिरस्तेदारीची जागा मिळाली असें समजतें.

मि० एटकिन साहेब अकोल्याच्या हायस्कुलाचे हेड मास्तर इन्स्पेकटरच्या जागेस उमेदवार होते त्यांस रेसिडेंट साहेबांकडून असा जबाब मिळाल्याचें ऐकतों कीं ती जागा तुह्मांस मिळेल अशी आशा तुह्मी धरूं नये. इन्स्पेक्टरची जागा भरावी किंवा नाहीं याविषयीं अजून निश्चय नाहीं. व भरावी असें ठरल्यास ती नेटिवास द्यावी अशी सर रिचर्ड मीड साहेब यांची इच्छा आहे असेंही समजतें व या त्यांच्या उत्तम हेतूकरितां आह्मी सर्व नेटिव लोक त्याचे उपकार मानितों. नेटिवाविषयीं अभिमान धरणारे युरोपियन फार थोडे आहेत हें आमच्या देशाचें मोठें दुर्दैव आहे ह्मणून सर रिचर्ड मीड साहेबांसारख्या थोर गृहस्थांनीं ही जागा नेटिवास द्यावी असा आग्रह धरिला आहे त्यापक्षीं तो निरर्थक होणार नाहीं अशी आह्मी आशा करितों. लार्ड नार्थब्रूक साहेब यांनीं कृपा करून आमच्या प्रांताला डायरेक्टर नेटिव दिले याविषयीं आह्मास त्यांचें चिरकाल स्मरण राहील. त्याचप्रमाणें मीड साहेबांचे प्रयत्नानें इन्स्पेक्टरची जागा नेटिवास मिळेल तर त्यांचीही आठवण बहुत काल मर्याद नेटिव लोक विसरणार नाहींत.

इन्स्पेक्टर नेमावयाचा असें ठरल्यास ही जागा कोणास द्यावी याविषयीं आतां भानगड राहिली नाहीं असें सर्वांस दिसून येईल. कारण युरोपियन उमेदवार गाळाऊ केले ह्मणजे रा. रा. श्रीराम भिकाजी जठार यांचेंच नाव रेसिडेंट साहेबाकडे शिफारस होऊन गेलेलें आहे असें फार दिवसांपासून आपण ऐकतों. व ते त्या जागेस सर्वांशीं योग्य व हक्कदार आहेत यांत काडीमात्र संशय नाहीं.

मे० शेख हिसामोदीन साहेब असिस्टंट क्यांटनमेंट माजिस्ट्रेट तीन महिन्यांची रजा घेऊन सुरतेस गेले होते पण कांहीं घरगुती जरूरीचे कारणामुळें ते रजा संपण्यापूर्वीं सिकंदराबादेस परत आले असें समजतें.

मि० अबदुल हक्क एक्स्ट्रा असिस्टंट कमिशनर तीन महिन्यांचे रजेवर गेले आहेत. त्यांची ती रजा संपली व आणखी दोन महिन्यांच्या रजेचा त्यांनीं अर्ज केला आहे असें समजतें. आमचे हक्कसाहेब महिन्याचे महिने असे बाहेर राहूं लागले यावरून ते वऱ्हाडास कंटाळले असावेत असें दिसतें. नशीब आमच्या मुलखाचें!

रा. रा. पुरुषोत्तम राव नारायण भट अडगावचे एक्स्ट्रा असिस्टंट कमिशनर व मि० आर्देसर दिनसाजी अकोटचे तहशिलदार शिमग्याचे सुटींत मेजर बेल साहेब यांस भेटण्याकरितां येथें आले होते ते गेले रविवारीं परत गेले.

रा. रा. पुरुषोत्तमराव एक्स्ट्रा असिस्टंट कमिशनर यांनीं वऱ्हाडसमाचारांत त्यांच्या कोर्टांत काम कमी असल्याच्या संबंधानें जो मजकूर आला होता त्याविषयीं डिपुटी कमिशनर साहेबांस तपशीलवार एक रिपोर्ट केला व त्यांत काम कमी नसतां अधिक आहे असें दाखवून दिलें व त्याच कारणाकरितां योग्य वाटल्यास वऱ्हाडसमाचारावर कांहीं तजवीज करावी असें लिहिलें होतें; परंतु पोक्त व विच्यारी डिपुटी कमिशनर मेजर बेल साहेब यांणीं तुह्मास अशा खटपटींत पडण्याचें कांहीं कारण नाहीं असें त्यांस कळविलें असें समजतें. पुरुषोत्तमराव यांणीं आह्मास ती माहिती कळविली असती तरीदेखील आह्मी ती प्रसिद्ध केली असती. अस्तु. आतां त्याच त्या गोष्टीविषयीं अधिक लिहून उपयोग नाहीं. पुरुषोत्तमराव हुशार आहेत त्याप्रमाणें त्यांची योग्यता वर्धमान व्हावी. व लांच न खाणें, पक्षपात न करणें याविषयींचें त्यांचें व्रत आहे त्याचप्रमाणें बारिक सारिक गोष्टांतही लोकांनीं कुरकुर न करावी याकडेही त्यांनीं लक्ष्य देऊन सर्व प्रकारांनीं निर्दोष अशी कीर्ति संपादन करावी, व असे उत्तम मोहोरे आमचे देशांत चिरकाल असावेत असें सर्वतोमुखीं त्यांनीं ह्मणवून घ्यावें अशी आमची मनापासून इच्छा आहे.

अकोल्याचे तहशिलदार रा. रा. भास्कर महेश्वर लेले यांस ५०० रुपये पर्यंतच्या दिवाणी फिर्यादी पहाण्यांचा या आठवड्यांत नवीन अधिकार मिळाला. व असिस्टंट कोर्टांतील शिलकी फिर्यादी आणि दरखास्ती त्यांकडे पाठवाव्या असा हुकूम झाला. भास्करराव मोठे मेहेनती व खरे निस्पृह आहेत तेव्हां अशा गृहस्थास काम अधिक मिळालें याबद्दल आह्मांस संतोष वाटतो. व अधिक काम आलें असतांही ते त्याचे अधिक लवकर निकाल करितात असें जर वरिष्ठांचे नजरेस आलें तर ते कामाप्रमाणें त्यांचा दरजाही वाढवितील अशी आह्मी उमेद बाळगतों.

आमचे बंधू उर्दूअखबारचे एडिटर रा. रा. धोंडो बाळकृष्ण देव यांस वऱ्हाडांत कोठें सरकारी नोकरी देऊं नये असा एक दोषास्प ठराव झाला होता व तो रद्द व्हावा अशाविषयीं आह्मी मागें रेसिडेंट साहेबांस शिफारसही केली होती याची आमचे वाचकांस आठवण असेल. आतां आह्मांस लिहिण्यास संतोष वाटतो कीं, आमचे नवीन हुशार व चाणाक्ष रेसिडेंट साहेब यांनीं तो ठराव रद्द केला व ठरविलें कीं ही शिक्षा त्यास फार भारी आहे सबब नोकरी मिळण्यास त्यास हरकत असूं नये.

धोंडोपंत यांवर हें मोठें किटाळ आलें होतें व तें दूर झालें याबद्दल आह्मी आनंद मानितों. आमची इच्छा आहे कीं धोंडोपंतांनीं आतां आपले निर्वाहाचा मार्ग चांगला, निर्भय, व सफळ असा असेल तो शोधून घ्यावा. सरकारी नोकरी हें दास्य आहे सबब ती पतकरावीच अशी आमची शिफारस नाहीं. त्यापेक्षां स्वतंत्रतेचा कमी फायद्याचाही धंदा चांगला; पण तो हि पेशा नोकरीचाच राहील तर त्यापेक्षां सरकारी नोकरी अधिक चांगली व भरवशाची होय असें आह्मांस वाटतें.

मुंबईस सालमजकुरीं वकीलीची परीक्षा झाली तींत वऱ्हाडापैकी २ गृहस्थ पास झाले. एक खामगावचे म्युनिसिपल सेक्रटरी रा. अंताजी गोविंद उमरावतीच्या प्रमोदसिंधु कर्त्याचे बंधु, व दुसरे रा. श्रीनिवास नरसिंव्ह मुधोळकर इलिचपुरच्या डिपुटी इ० इन्स्पेक्टराचे बंधु.

## सिंक्लेर मेमोरियल फंड.

| | रु. |
|---|---|
| रा. बामन कृष्ण क्युरेटर अकोलें | १० |
| ,, हरि धोंडदेव फ. अ. मा. अकोलें | १० |
| ,, देवराव विनायक वकील अकोलें | १० |
| मि० महमद इस्मायल डेपुटी क्लार्क | ७ |
| रा. बाळकृष्ण काशिनाथ क्लार्क डा. | ५ |
| ,, विष्णु आत्माराम से. अ. मा. अकोलें | ५ |
| ,, खंडेराव बाळाजी एडिटर | ५ |
| ,, नारायण विठ्ठल हेड मा. पिंजर | ५ |
| ,, महादाजी गंगाधर हे. मा. डोणगाव | ५ |
| ,, गोपाळ हारि अ. मा. मेहेकर | ४ |
| ,, गोविंद महादेव अ. मा. मलकापुर | ४ |
| ,, बाळकृष्ण सिताराम अ. मा. मेहेकर | ३ |
| ,, गोपाळ रघुनाथ हे. मा. सिंदखेड | ३ |
| ,, तुकाराम रामचंद्र अ. मा. अकोलें | ३ |
| ,, सखाराम महादेव अ. मा. मलकापुर | ३ |
| ,, सदाशिव रघुनाथ हे. मा. जानेफळ | ३ |
| ,, विष्णु मोरेश्वर हे. मा. लोणार | ३ |
| ,, भिकाजी भगवंत हे. मा. फत्तेखेलडा | ३ |
| ,, विठ्ठल मोरेश्वर हे. मा. देऊळगावसा. | ३ |
| मि० गुलाम महमद हिं. मा. मेहेकर | ३ |
| ,, मुनसी महमद अली हे. मा. सिंदखेड | ३ |
| ,, गुलहमीदखा हिं. हे. मा. लोणार | २ |
| ,, अजीमोदीन हेडमा. मु. शा. मेहेकर | २ |
| ,, वलीमहमद हिं. मा. पिंजर | २ |
| ,, सालरजंगखा हिं. मा. फत्तेखेलडा | २ |
| ,, तसदुक हुसेन हिं. मा. डोणगाव | २ |
| रा. देवीदास पांडुरंग हे. मा. घाटबोरी | २ |
| ,, महादेव आनंदराव हे. मा. अंजनी | २ |
| ,, मोरो गणेश अ. मा. पिंजर | २ |
| ,, रामचंद्र बाबाजी अ. मा. अकोलें | २ |
| ,, गोविंद विष्णु भावे अ. मा. मलकापुर | २ |
| ,, कृष्णाजी नारायण हे. मा. कोथळी | २ |
| ,, रामकृष्ण व्यंकटेश अ. मा. डोनगाव | २ |
| ,, गोविंद सोनाजी हे. मा. सुलतानपूर | २ |
| ,, नारायण मनाजी हेड मा. बिबी | २ |
| ,, गोपाळ कृष्ण हेड मा. गुंधे | २ |
| ,, विठ्ठल नारायण हेड मा. अंजनी | २ |
| ,, बापूजी केशव हे. मा. किणगाव जट्टु | २ |
| ,, बाळकृष्ण बाबाजी हे. मा. शेलगाव | २ |
| ,, हरी नारायण हे. मा. देऊळगाव काळी | २ |
| ,, विष्णु बाळकृष्ण हे, मा. किनगाव राजा | २ |
| ,, अंबादास बापुजी हे. मा. कळंबेश्वर | २ |
| ,, जिवाजी भिमराव हे. मा. चयगाव | २ |
| ,, गोविंद रामकृष्ण अ. मा. सिंदखेड | १ |
| ,, खंडेराव गणेश अ. मा. फतेखेलडा | १ |
| ,, बाळनाथ व्यंकटेश अ. मा. मेहेकर | १ |
| ,, खंडू हरी असिस्टंट मास्तर डोणगाव | १ |
| रा. व्यंकटेश [illegible]ंग अ. मा. सुलतानपुर | १ |
| ,, अमृत [illegible] अ. मा. सुलतानपुर | १ |
| मि. म[illegible]सामिल्ला अ. मा. मेहेकर | १ |
| ,, अबदुल रहेमान अ. मा. सिंदखेड | १ |
| रा. मनुसिग लक्ष्मणसिंग पाटील पिंजर | १ |
| | १५३ |
| मागील जमा | ५३३-८ |
| मिळून एकंदर | ६८६ ८ |

## वर्तमानसार

[illegible] ठवि

मुंबई हायकोर्टांत, एक [illegible] एका [illegible] छब्बतील [illegible] स्थ वेडा असून आपले [illegible] कतील आणि

त्या करण्यास असमर्थ आहे असा त्याचे आप्तवर्गानीं दावा केला होता. व तो वेडा असल्या विषयीं दोघा डाक्टरांच्याही साक्षी झाल्या होत्या. परंतु हायकोर्टानें तिकडे लक्ष न देतां तो आपले इस्टेटीची व्यवस्था करण्यासारखा शहाणा आहे असें ठरविलें. त्याच गृहस्थानें आठ चार दिवसांपूर्वी गळ्यास फांस लावून आत्महत्या करून घेतली. डाक्टरांच्या साक्षीविरुद्ध हायकोर्टाचा समज कसा झाला असेल तो असो.

मुंबई एथें मागील शुक्रवारीं एक गोसावी मुंबादेवीच्या तळ्याच्या मधील खांबाच्या शेंड्यावर जाऊन तेथील तक्ष्मावर मांडी घालून बसला. हा खांब तळ्यातील पाण्याच्या सपाटीपासून २० फूट ह्मणजे १४ हात उंच आहे. त्यास खालीं उतरण्याविषयीं बहुतांनीं विनती केली पण तो ह्मणे, "मला दोन हजार रुपये कोणी देईल तरच मी उतरेन" तो तेथें खाण्यापिण्यावाचून बसला होता. मग तो केव्हां उतरला असेल हें माहित नाहीं. याप्रमाणें त्रागा करणाऱ्या कांहीं भिकाऱ्यांस यथास्थित शिक्षा केली ह्मणजे दुसरे भिकारी त्रागा करण्यास भितील.

मद्रास एथें पटकीचा उपद्रव कमी होऊन देवीचा उपद्रव फार चालू झाला आहे.

आताशीं स्टेट सेक्रेटरी लार्ड सालिस्बरी हिंदुस्थानच्या गवरनर जनरलास व दुसऱ्या गवरनरांस फार हुकमतीनें लिहित असतात. याच कारणावरून लार्ड नार्थब्रूक यांनीं आपल्या कामाचा राजीनामा दिला असावा असा कोणी कोणी तर्क करतात. ज्ञा. द.

युवराज तारीख ९ रोजीं इंदुरास पोहचले, यास चोरल चौकीच्या स्टेशनावर जनरल डाली इंदूरचे रेसिडेंट हे सामोरे गेले होते. व होळकर इंदूराबाहेर पांच मैल आले होते. होळकराच्या राजधानींत युवराजाच्या प्रवेशाची स्वारी फार दुबळी दिसत होती. तेथें ध्वज पताका व कमानी वगैरे कांहीं नव्हतें. रस्त्याच्या दुतर्फा होळकराचें लष्कर मात्र उभें होतें. दुपारीं युवराजांनीं धार, देवास, रतलाम आणि जावरा एथील राजे लोकांच्या मुलाकती घेतल्यानंतर ते शहरांतून लाल बागेंत गेले. तेथें दरबार भरविलें होतें. देणग्यांची देवघेव झाल्यावर चिरागांनीं रोषन केलेल्या रस्त्यांतून परत गेले. रेसिडेंन्सींत रात्रीं बाल व खाना झाला.

विलायतेंतील पार्लमेंट सभेंत हल्लीं राणी साहेब जो नवीन [illegible] धारण करणार आहेत त्याजविषयीं [illegible] भानगड चालली आहे. हा किताब "एम्प्रेस आफ इंडिया, असा होणार असें कालच्या तारेवरून समजतें. परंतु त्या देशांतील बहुधा सर्व लोकांचा अभिप्राय असा दिसतो कीं, एम्प्रेस हें नाव कोन या नावाच्या योग्यतेचें नाहीं परंतु हलक्या प्रतीचें आहे. ग्ल्याडस्टन व त्यांच्या तर्फेच्या मंडळीनें या किताबाविरुद्ध भाषणें केलीं [illegible]न व तेथील बहुधा सर्व वर्तमानपत्रांचा [illegible] कल दिसतो. पुढें परिणाम होईल तो पहावा. सु. प.

ला ने

बजाविलें

सर कावसजी जहांगीर रेडीमनी यांस बारोनेटची पदवी मिळणार आहे असें ह्मणतात.

मद्रासचे गवरनर ड्यूक आफ बकिंगहाम ता. ८ मिनहूस मद्रासेस पोंचले.

इंग्रजी मराठी शाळेंतील मास्तरांनीं शाळेंतील मुलांस खासगी रीतीनें शिकवूं नये असा कर्नल टी वाडिंगटन यांणीं हुकूम केला आहे. हा प्रतिबंध एक दोन मास्तरांच्या गैरवर्तनामुळें झाला.

बडोद्याचे पदच्युत गायकवाड श्री० मल्हारराव यांस डीटन हौसमध्यें चैन पडत नाहीं ह्मणून त्यांस आठवड्यांतून दोन वेळ रसायन शास्त्राचे प्रयोग करून दाखविण्याची तजवीज झाली आहे.

टर्कीं सरकारचा पराभव—टर्कीं सरकारच्या फौजेची व बंडवाल्यांची लढाई गोरंकम याजवळ ता. ६ मिनहू रोजीं झाली तींत टर्कीं सरकारचा पराभव होऊन तोफखाना गेला, आठशें मनुष्यें मेलीं. व शिवाय पुष्कळ लोक जखमी झाले.

बडोद्याचे दिवाण सर टी. माधवराव यांनीं गायकवाडाच्या मुलखांत दवाखाने घालण्याचा आणि देवी काढण्याचा ठराव केला आहे असें समजतें. इं. प्र.

कल्याणास एका हिंदु मनुष्याचा पोपट चोरीस गेला त्यावरून खटला झाला त्यांत पोपटही साक्षी देण्याकरितां कोर्टांत हजर केला होता, आणि त्यानें आपल्या जबानींत कांहीं हिंदु शद्ब उच्चारले पण माजिस्त्रेटास वाटलें कीं त्याच्या बोलण्यांत कांहीं मुसलमानी शद्बही आले. सबब यावरून कांहीं ठरत नाहीं असें ह्मणून त्यानें खटला सोडून दिला. फिर्यादीनें वरिष्ट कोर्टाकडे अपील केलें आहे.

नाशिक व त्र्यंबकचे दरम्यानचे रस्त्यावर जी दस्तुरी द्यावी लागते ती तारीख ३१ मिनहू पासून माफ करण्याबद्दल सरकारची मंजुरी मिळाल्याचें समजतें.

पंढरपुरास एका शूद्र जातीच्या स्त्रीचें १९ दिवसाचें मूल, रात्रीं ती निजली असतां तिच्या पुढून घुशीनें नेलें. ती जागी होऊन शोध करितां तें मूल एका बिळांत मिळाल्याचें कळतें.

सर आलबर्ट सासून यांणीं, युवराजाचे मुंबईस आगमनाचें स्मरणाकरितां प्रिन्स आफ वेल्स यांचा अश्वारूढ पुतळा करून देण्याचें कबूल केलें आहे. या पुतळ्यास अजमासें ५०००० रुपये खर्च लागेल.

लार्ड लिटन नवीन गव्हरनर जनरल मुंबईस येतील तेव्हां त्यांस भेटण्याकरितां गायकवाड. शिंदे, सर सालरजंग वगैरे मंडळी येणार आहे. भेट झाल्या उपरांत शिंदे सरकारची स्वारी तशीच श्रीरामेश्वराचे यात्रेस जाणार ह्मणून समजतें.

चिनी लोकांची एक व्यापारी मंडळी तयार झाली आहे. या मंडळीचा उद्देश असा आहे कीं, चीन व इंग्लंड यांच्या दरम्यान चालणारा व्यापार आपल्या मार्फत चालावा. व या करितां ती मंडळी आपलें मुख्य दुकान विलायतेस स्थापन करण्याच्या विचारांत आहे.

मुंबईचे सावकार गोकूळदास देवजी हे नुकतेच पंढरपुरास गेले होते त्या वेळेस त्यांनीं श्रीपांडुरंगास ७००० रुपयाची मोत्याची कंठी दिली.

अस्वलें मारण्याबद्दल त्यांचे प्रतीप्रमाणें १२।६।३ रुपये बक्षीस मिळण्याविषयीं नविनच ठराव झाल्याचें समजतें.

युवराज ग्वालेर येथें गेले होते. त्यांचे साठीं जो बंगला शिंदे सरकारांनीं तयार करविला होता त्याचे कारागिरांस शिंदे सरकारांनीं १ लक्ष रुपये बक्षीस दिले.

युवराजांचे आगमनस्मारका निमित्त १२५ रुपये महिन्याची एक तीन वर्षें पर्यंत रहाणारी स्कालरशिप बंगाल विद्याखात्यास रायधनपतसिंग बहादूर यानीं दिली. ज्ञा. च.

## दस्तुऱ्यांची माफी.

सन १८७५ च्या ३ऱ्या आक्टाच्या ९ व्या कलमांतील अधिकाराप्रमाणें ता. ९ मार्चीच्या मुं. सर० च्या ग्याझेटमध्यें दस्तुऱ्या घेण्याच्या माफीबद्दल नियमादाखल एक जाहिरनामा प्रसिद्ध झाला आहे. या नियमांत ज्यांजपासून दस्तुऱ्या घेऊं नयेत ह्मणून ठरविलें आहे व त्या कायद्यांत ज्यांजबद्दल माफी दाखल केली ते खेरीज करून सर्वांपासून दस्तुऱ्या घेण्याचें ठरविलें आहे. माफीची कलमें येणें प्रमाणें:—

१. लष्करी अंमलदाराच्या हुकुमावरून लष्करी अंमलदार व फौजेबरोबरचे लोक, गाड्या, जनावरें वगैरे व सरकारी क्याटल फार्मपैकीं जनावरें.

२. ने. ना. गवर्नर जनरल व गवर्नर त्यांच्या बरोबरच्या लोकांसुद्धां.

३. परकी राज्याधिकारी अथवा एतद्देशीय संस्थानिक व त्यांच्या बरोबरचे लोक शिवाय कलेक्टर, रेविन्यू कमिशनर अथवा सरकार यांस ज्या दुसऱ्या नामांकित एतद्देशीय गृहस्थांस माफी करण्यास योग्य वाटतील ते.

४. स्वारांच्या अथवा तोफखान्याच्या पलटणींचे गवत कापणारे.

५. शेतकरी, लांकूड फांटी तोडणारे, गवत कापणारे व तशाच प्रकारचे दुसरे लोक ज्यांस आपल्या दररोजच्या धंद्याकरितां वाटेनें दररोज अगर नेहमीं जावें लागेल ते. ( या लोकांच्या माफीविषयीं बरोबर निर्णय करणें तो कलेक्टरांनीं करावा ).

६. सरकारी खजिन्याच्या गाड्या, व रोबरचे लोक सामान सुद्धां.

७. लोकोपयोगी सरकारी इमारती वगैरे कामें बांधण्याच्या अगर दुरुस्त करण्याच्या कामाकरितां सामान नेण्याकरितां लावलेल्या गाड्या; मग हीं कामें बादशाही इलाख्याच्या अथवा लोकल या कोणत्याही फंडांतून चालू असोत.

याशिवाय दुसऱ्या कोणत्या सरकारी कामाकरितां भाड्यानें गाड्या वगैरे कराव्या लागतील, त्याजबद्दल दस्तुरी द्यावी आणि कंटिंजेंट बिल करून पैसा परत घ्यावा. उदाहरण, कलेक्टरानें आपल्या सामानाच्या व सरकारी दप्तराच्या व तंबूच्या सर्व गाड्यांबद्दल दस्तुऱ्यांचा पैसा द्यावा आणि कंटिंजेंट बिल करून शेवटच्याबद्दल पैसा परत घ्यावा.

८. सर्वे खात्याचे पट्टा घातलेले शिपाई. इं. प्र.

## नोटिसा.

श्रीपत वलद खेत्री वंजारी रहाणार मौजे किनखेड तालुके अकोले जिल्हा मजकूर यास खालीं सही करणार याजकडून नोटिस देण्यांत येतें कीं तुह्माकडे खातेबाकीबद्दल साडेबेचाळीस रुपये येणें त्याजबद्दल कितीएक वेळ मागणें केलें असून तुह्मी देत नाहीं. हल्लीं या नोटिशीनें कळवितों कीं तुह्मास ही नोटिस पावल्यापासून आठ दिवसांत रुपये द्यावे न दिल्यास पुढें जितके दिवस रुपये रहातील त्याजबद्दल व्याज दर बारा आणे प्रमाणें द्यावें लागेल व फिर्याद केल्यास त्याचा खर्च द्यावा लागेल हें पक्कें समजावें. तारीख ४ माहे मार्च सन १८७६ इसवी.

[ सही ] बसापा धुळापा वाणी
मुक्काम पिंजर.

### नोटिस

लक्ष्मण वलद कवडाजी काकड वस्ती मौजे शेंदुरजन प्रगणें मंगरूळ पीर तालुके मजकूर जिल्हे वाशिम यांस नोटिस देणार कमळजा मर्द लक्ष्मण काकड वस्ती कसबे मंगरूळ पीर तालुके मजकूर. इजकडून नोटिस देण्यांत येतें कीं, तुजशी माझें लग्न लागण्यास सुमारें १४ वर्षें झालीं. तूं आपले घरीं लग्न झाले ते दिवसांपासून दोन वेळा मूळ येऊन मजला घेऊन गेला. कांहीं दिवसांनीं तुझा मजला गर्भ राहून एक मुलगीही झाली होती ती मरण पावली. आतां कांहीं संतति नसून च्यार वर्षांपासून तूं मजला टाकून देऊन दुसरी बायको मी जिवंत असतां लग्नाची केली. परंतु तूं लग्नाची बायको करते वेळीं माझे संसाराचा व च्यार वर्षांत मजला माझे बापाचे घरीं काय खर्च लागला असेल याचा कांहींच विच्यार पाहिला नाहीं व सदहू बाबतींत पंचाईत झाली त्यांतील पंच. गंभीरजी मेढे, खंडू जाधव, नाथजी जाधव, रामजी तिरोळकर, बाबूजी पांगूळ, उत्ताजी पाटील टिटवेकर यापंचानीं पंचाईत केल्यांत तूं त्याची गोष्ट मान्य केली नाहीं. सबब आतां या नोटिशीनें तुजला कळविलें जातें कीं ह्या नोटिशीचें तारखेपासून एक महिन्यांत माझी फारकती करून द्यावी आणि माझे बापाचे घरीं मजला खर्च दरमहा रुपये ४ कंपनीप्रमाणें लागला त्या खर्चाचे रुपये १९२ च्यार वर्षांचे द्यावे असें तुमचेकडून सदहू मुदतींत न होईल तर पुढें तुमचे जबाबाची कांहीं वाट न पहातां रीतीप्रमाणें दुसरा नवरा करीन आणि नोटिशीचे खर्चा समेत एकंदर रुपये तुमचे पासून दावा करून घेण्याची तजवीज होईल हें खूप समजावें. कळावें तारीख १९ माहे मार्च सन १८७६ इसवी.

( सही ) कमळजा मर्द लक्ष्मण
काकड निशाणी खुद
हातची
बांगडी.

हें पत्र अकोलें एथें खंडेराव बाळाजी फडके यांचे वऱ्हाडसमाचार छा.छा. प्र.

REGISTERED NO. 7, 1876

# वऱ्हाडसमाचार.

पुस्तक १०  अकोला, रविवार ता० २६ माहे मार्च सन १८७६ इ०  अंक १३

## वऱ्हाडसमाचाराचीकिंमत

| | |
|---|---|
| वर्षाचे अगाऊ | ६ |
| सालअखेर | ७ |
| फुटकळ अंकास | ०४ |
| डांकहाशील | |
| वर्षाचे अगाऊ | १०८ |
| " अखेर | २ |

☞ नवीन वर्गणीदार होऊ इच्छिणारे लोकांकडून आगाऊ वर्गणी यावी ह्मणजे पत्र सुरू केलें जाईल.

## नोटिसीबद्दल.

| | |
|---|---|
| मराठी, दर ओळीस | ०१०६ |
| तीच नोटिस दुसरे खेपेस | ०१ |
| इंग्लिश लिपींत दर ओळीस | ०४ |
| ,, दुसरे खेपेस | ०२ |

## जाहिरखबर.

श्री शंकर भारती स्वामी संस्थान मुख्य शृंगेरी कुंडली— विद्यमान रघुनाथ शास्त्री देशाधिकारी निसबत संस्थान मजकूर— प्रांत वऱ्हाडांतील समस्त ब्रह्मवृंद मंडळी यांसी त्रिसंध्याकाळीं आशीर्वाद तुह्माकारणे कळवितों कीं, अकोट तालुक्यांतील कसबे दहिहंडा एथील समस्त ब्राह्मण मंडळी ही केवळ कलीचें मुख्य स्थान होय. यांची स्थिति लिहवत नाहीं. पहा, आपल्या गुरूकडील मुद्रा आली असतांना त्याची निर्भर्त्सना करून पूजा न देतां अपमान केला याजकरितां त्यांस मठांतून निर्बंध केला आहे. तर शुध्दपत्र येई तोंपर्यंत त्या मंडळीबराबर अन्नउदकादिक व्यवहार कोणी करूं नये. ही आज्ञा अमान्य केल्यास सहस्त्र ब्रह्महत्येचें पातक असो. मिती फाल्गुन वद्य ९ शके १७९७ युवा नाम संवत्सरे.

(सही) त्रिंबक काशिनाथ परांजपे
कारकून निसबत संस्थान
मजकूर.

## पत्रव्यवहार

या सदराखालील मजकूर पत्रकर्त्यांच्या मतास मिळूनच असतील असें समजूं नये.

**वर्तमानपत्रें छापण्याची मोकळीक**

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांस—

वि. वि. खालीं लिहिलेले आमचे अल्प विच्यार कृपा करून प्रसिद्ध करावे.

या मोकळिकेविषयीं विचार करणें फार जरूरीचें आहे कारण नेटिव वर्तमानपत्रांतून जर अशा गोष्टीचा विचार झाला नाहीं, तर पत्रकर्त्यांनीं आपलें कर्तव्य बजाविलें नाहीं असें होईल. ज्या प्रांतामध्यें जें वर्तमानपत्र निघतें, त्या प्रांतांतील लोकांच्या नडी, त्यांचे विचार, व सार्वजनिक दुसऱ्या गोष्टी त्या पत्रद्वारा सरकारच्या कानावर जाव्या, आणि त्यांपासून लोकांचें कल्याण व्हावें, हा मूळ वर्तमानपत्रांचा उद्देश आहे. तुमचे बंधू उडदू अखबाराचे एडिटर यांनीही या विषयावर एक दोन वेळां बरींच आर्टिकलें लिहिलीं होतीं त्या आर्टिकलांत "वर्तमानपत्रें हीं कामधेनू आहेत. व यांचा सर्व लोकांनीं अंगीकार करावा असें त्यांनीं ह्मटलें आहे" व ही गोष्ट खरी आहे असें ह्मणण्यास हरकत नाहीं. तरी आह्मांस वाटतें कीं, केवळ देशाचें हित करण्याच्या बुद्धीनें जीं पत्रें निघतील, किंवा निघत आहेत त्यांना कामधेनूची उपमा देणें रास्त आहे. आतां मोठा प्रश्न असा कीं इतके दिवस आमच्या दयाळू सरकारानें या स्वातंत्र्याचा उपभोग नेटिव पत्रकर्त्यांस घेऊं दिला. व त्यांस त्याची अलीकडे चव लागूं लागली न लागली, तोंच सरकार हें स्वातंत्र्य त्यांपासून दूर करूं पहात आहे हें फार दुःखाचें आहे. मनुष्याला एखादें सुख मुळींच ठाऊक नसतें तोंपर्यंत त्याला त्याबद्दल कांहींएक वाटत नसतें, आणि त्याला तें एकदां प्राप्त झालें आणि त्याची चव त्याला लागली; ह्मणजे त्याला त्या शिवाय चैन पडेनासें होतें. आतां अशी अमोलिक देणगी सरकारानें अगोदर पत्रकर्त्यांत दिली कां? आणि तें परत घेऊं पहातें कां? याचा विचार करणें जरूर आहे. पाहिला विचार असा आहे कीं, सरकारास ही देणगी देतांना असें वाटलें असेल कीं "हिंदुलोक अजून गरीब आहेत, भांडण करणें, श्रेष्ठ अधिकाऱ्यांच्या चुका काढणें, राज्य प्रकरणांत हात घालणें वगैरे गोष्टी त्यांस कांहीं बरोबर कळत नाहींत व अशामुळें आपणास कांहीं एक अपाय होण्याचा संभव नाहीं, मग" इंग्लिश सरकारानें नेटिवांस वर्तमानपत्रें छापण्याचें स्वातंत्र्य दिलें आहे" अशा प्रकारच्या थोरवीचें नांव तरी आपण कां घेऊं नयें? असें वाटलें असेल. आतां हिंदु लोक शहाणपणानें इंग्लिश लोकांच्या मागें आहेत असें नाहींत, कांहीं बाबतींत तिळभर अधिकही येतील, या देणगीचा वास्तवीक उपयोग कसा करावा, व तिच्यापासून आपला नफा कसा करून घ्यावा हें त्यांस फारच थोड्या काळांत कळूं लागलें, व त्यामुळें प्रत्येक बाबतींत अधिकाधिक स्वातंत्र्य मिळविण्याच्या कामांत सरकाराशीं भांडणें, पाश्चिमात्य नोकरांच्या चुका आणि त्यांचे ढळढळीत अपराध लोकांपुढें आणणें, कायदेकानूंचा विच्यार करणें वगैरे महत्वाच्या आणि राज्यप्रकरणाच्या कामांत आमचे [ कित्येक युरोपियन लोकांच्या मताप्रमाणें] मूर्ख लोक हात घालूं लागले आणि येणेंकरून युरोपियन नोकरांना पाहिजे तसें वर्तन करितां येईनासें झालें. दुसरा विच्यार असा कीं, हीं पत्रें कित्येक अल्प विच्यारी लोकांच्या हातीं पडल्यामुळें त्यांत वजन नाहींसें झालें. व या लोकांनीं योग्यायोग्यतेचा विचार न करितां केवळ मराठी भाषा येते या भरंवशावर पाहिजे तें लिहिण्याचा सपाटा चालविला, ज्याला थोडें बहुत मराठी लिहितां वाचतां येऊं लागलें, त्याचा पहिला विचार वर्तमानपत्रांत आर्टिकलें देण्याचा. कित्येक वेळ आमच्या नजरेस असें आलें आहे कीं, अगदीं मूर्ख मनुष्यानेंसुद्धां बडोद्याच्या प्रकरणांत व्हाइसरायाला दोष देण्यांत मागें पुढें पाहिलें नाहीं. अशा लोकांनीं लिहिलेलीं आर्टिकलें वाचून जर कोणी शहाण्या मनुष्यानें क्षणभर त्यांच्या विषयीं विचार केला तर, कोणा एका व्यक्तीला उद्देशून किंवा सरकाराला उद्देशून दोष देणें या शिवाय किती वाचपलें तरी दुसरें कांहीं एक त्याच्या हातीं लागणार नाहीं. अशा योग्यतेच्या पत्रावरून ही अमोल्य देणगी तुह्मा लोकांपासून परत घेण्याविषयीं सरकारचा विचार होत असेल असें वाटतें. पण सरकार असें करीत आहे हें उचित् किंवा अनुचित याचा विचार करून, सरकारास आपणाकडून तसें सांगणें तुमचें काम आहे. मग सरकार तुमची प्रार्थना पुरवो कीं न पुरवो. ही त्यांच्या कृपेची गोष्ट आहे. आपण हिंदू ह्मणजे जित लोक तेव्हां आह्मांस त्या बाबतींत अधिक बोलतां येत नाहीं. उदाहरणार्थ आज तुह्मीं सर्व हिंदु लोक घरची सर्व मालमता आमच्या स्वाधीन करा, आणि उदरनिर्वाहा पुरतें अन्न व उदक प्राशनास मृत्तिकापात्रें, आणि वापरण्यास मांजरपाठ आह्मी तुह्माला देतों" असें जरी ह्मटलें तरी तसें आह्मांस करावें लागेल. यांत सरकाराकडे तो दोष काय? आह्मी आपल्या नशिबास दोष दिला पाहिजे.

सरकार आह्मांस निष्ठुरतेनें न वागवो, अशी आमची परमेश्वराला दीर्घ प्रार्थना आहे. अतिशय अंत पाहणें हें अगदीं वाईट. कारण त्यापासून एखादें वेळीं परिणाम वाईट होतात, याकरितां सरकारला आपल्या राज्याचा आतां जरी पाया फार खंबीर वाटत आहे, तथापि आह्मी केवळ प्रजा धर्माला अनुसरून, राजनिष्ठा शिरसावंद्य मानून अदबीनें ज्या सूचना, विनवण्या, आणि कान उघडण्या करीत आहो त्यांचा सरकारच्या धुरंधर विद्वान व शहाण्या युरोपियन बड्या अधिकाऱ्यांनीं अनादर करूं नये. कारण कृत्य एक करितो आणि त्याचें फळ दुसऱ्यास भोगावें लागतें असें वारंवार आपल्या दिसण्यांत येतें. आतांच्या कामगारांनीं नेटिवांच्या असंतोषाला कांहीं एक कारण करून ठेविलें, व त्यापासून तात्कालिक जरी कांहीं परिणाम झाला नाहीं तथापि तें अगदीं नाहींसें झालें असें त्यांनीं समजूं नये, रोगाचें बीं एकदा लागलें ह्मणजे तें असें आपलें मूळ सोडीत नाहीं तसें लोकांचीं मनें एकदां उडालीं ह्मणजे पुन्हा तीं ताळ्यावर आणण्यास फार प्रयास लागतील.

वर्तमानपत्रें छापण्यास दिलेले स्वातंत्र्य सरकार मागें घेत आहे हें फार वाईट आहे असें आह्मी प्रजेच्या नात्यानें, खुशाल ह्मणतों- ज्या लोकांस चांगली वस्तू ठाऊक नाहीं त्या लोकांस ती एकाएकी प्राप्त झाली असतां त्यापासून कांहीं कालपर्यंत वाईट परिणाम जरा झाला तथापि अंतीं तिचें फळ उत्तम येणारच. या स्वातंत्र्याचा उपयोग कसा करावा हें बरोबर अवगत नसल्यामुळें कित्येक वर्तमान पत्रांचे लेख जरी खराब निघत असले तरी तेवढ्याच कारणावरून सरकारानें हात आखडून घ्यावा यासारखें त्यांच्या औदार्याला आणि कृपाळू स्वभावाला लांछन आणणारें दुसरें कांहींच नाहीं.

ज्या वेळेस इंग्लंडामध्यें जिकडे तिकडे बंडाळी चालली होती व लोकांच्या मनाला स्वास्थ्य काय तें ठाऊक नाहींसें झालें होतें. राजामध्यें आणि प्रजेमध्यें दुफळ्या पडल्या होत्या, न्यायी प्रजेनें राजाला अपराधी ठरवून फाशी देण्याचा हुकूम फर्माविला होता व ज्या वेळेस उभयपक्षांची मनें कावरीं बावरीं झालीं होतीं अशा घोटाळ्याच्या वेळीं आणि या काळा नंतर शूर आणि बलाढ्य कामवेलाच्या कारकीर्दींत या अमोल्य स्वातंत्र्याकरितां अतिविद्वान, अति बुद्धिमान, आणि परम लोक हितेच्छु मिल्टन साहेब पार्लमेंट सभेशी भांडले, द्रव्याच्या बाबतींत, शरीराच्या बाबतींत झालेले तोटे न जुमानतां त्यांनीं रात्रं दिवस परिश्रम करून ही अमोल्य देणगी पार्लमेंट सभेपासून आपल्या लोक बांधवासाठीं मिळविली आणि तिचें फळ इंग्लंडांतील लोक आतांपर्यंत घेत आहेत. "दिवसेंदिवस जग शहाणें होत चाललें आहे" असा जिकडे तिकडे डंका चाललेला आहे. सतराव्या शतकांतील लोकांनीं जी देणगी इंग्लंडाला दिली ती एकुणिसाव्या शतकांतील लोकांस परत घ्यावी असें वाटणें हा ज्ञानाचा प्रसार काय? या स्वातंत्र्यापासून इंग्लंडाला जर नफा होत आहे तर हिंदुस्थानानेंच काय पाप केलें आहे कीं त्यापासून त्याला तोटा व्हावा? डिसरायली प्रभृति राज्य धुरंधर लोक असतां हे विच्यार त्यांच्या मनांत येत नाहींत हा मोठा चमत्कार नव्हे काय?

अग्नि फार धुमसत असला ह्मणजे तो केव्हां तरी पेट घेतो, त्याप्रमाणें अधिकाररूपी रक्षेनें मनोमयाग्नी जरी कांहीं वेळपर्यंत झांकून ठेविला तथापि तो जेव्हां अति उज्वलित होईल त्यावेळेस या रक्षेचें आवरण झुगारून देऊन प्रचंड रूपानें झळकूं लागेल आणि सरकार आणि प्रजा या उभयतांच्या संतापाला कारण होईल. वर्तमानपत्रद्वारें नित्य नित्य अधिकाऱ्यांचे दोष कानावर येणें हें अगदीं रास्त आहे अशा प्रकारची जर कांहीं भीति त्यांना ठेविली नाहीं तर, अंधार कोठडीच्या एका कोपऱ्यांत गुदमरून प्रजेला ते छळतील व एकच कल्होळ करून टाकतील आणि

राज्यरूपी इमारत थोड्याच दिवसांत डळमळण्याला लावतील, याकरितां सरकारास राज्य चिरकाल राहून हिंदु प्रजा सुखी रहावी व बंडे बखेडे कांहीं होऊं नयेत असें वाटत असेल तर ही देणगी त्यांनीं नेटिव पत्रकर्त्यांपासून परत घेऊं नये असें आम्हांस वाटतें. कळावें हे विनंती.

एक वाचक.

---

# वऱ्हाडसमाचार

मिती चैत्र शुद्ध १ शके १७९८.

---

## वऱ्हाड प्रांताचा सन १८७४-७५ चा रिपोर्ट.

वऱ्हाड प्रांताचा सन १८७४।७५ चा वार्षिक रिपोर्ट प्रांताचे कमिशनर मे० कर्नल नेंभार्ड साहेब बहादूर यांणीं केला, तो हैदराबाद रेसिडेन्सींत छापून गेल्या ज्यानेवारी महिन्यापासून बाहेर पडला आहे. त्यांत अनेक गोष्टी महत्वाच्या आहेत त्यां पैकीं कांहीं मुख्य आज आह्मी आमचे वाचकांकरितां येथें घेतों:-- ह्या प्रांताचें क्षेत्रफळ १७,२३९ चौरस मैल आहे. ह्या पैकीं सदर सालीं १०,०९९ मैलांत लागवड झाली होती, ३२४४ मैल जमीन लागवड होण्याजोगी होती आणि बाकीचे ३,८९६ मैलांत लागवड न होण्याजोगी जमीन होती. ही जमीन विशेषेंकरून एलिचपुर, बुलढाणें, वाशीम आणि वणी या जिल्ह्यांत आहे. लागवड होण्याजोग्या जमीनीं पैकीं सुमारें एक चतुर्थांश जमीनींत मात्र धान्य वगैरे जिन्नस उत्पन्न होत नाहींत. वऱ्हाडांत मुख्य जिन्नस ह्मटलें ह्मणजे कापूस, ज्वारी, गहूं आणि हरभरा. याशिवाय जवस, तीळ, करडी, तांदूळ, तूर, वगैरे प्रांताचे पुरवठ्या पुर्तीं सर्व धान्यें पिकतात. वरील चार मुख्य जिनसांत ज्वारी सुमारें २३ लक्ष एकर जमीनींत पेरली गेली असून तिचें उत्पन्न सुमारें एक कोट पावणेच्यार लक्ष मण झालें होतें व त्याची किंमत सुमारें एक कोटि सवा लक्ष रुपये झाली. तसाच कापूस साडेएकुणीत लक्ष एकर जमीनीवर पेरला जाऊन त्याचें उत्पन्न आठ लक्ष पंच्यायशी हजार मण होऊन त्याची किंमत सुमारें एक कोटि सवासासष्ट लक्ष झाली. गहूं सुमारें पावणेपांच लक्ष एकर जमीनीवर पेरला जाऊन त्याचें उत्पन्न सुमारें साडे चवदा लक्ष मण होऊन त्याची किंमत पावणेपसतीस लक्ष झाली, व हरभरा पावणे दोन लक्ष एकर जमीनीवर पेरला जाऊन त्याचें उत्पन्न साडेपांच लक्ष मणावर होऊन त्याची किंमत सवादहा लक्षावर झाली. एकंदर ज्वारी जिनसांमिळून पावणे पन्नास लक्ष एकर जमीन लागवड होऊन तिचें उत्पन्न एक कोट साडे बत्तीस लक्ष मण होऊन त्याची किंमत तीन कोटि पावणेनऊ लक्षावर झाली. याच प्रमाणानें बाकीच्या लागवड झालेल्या पावणेबारा लक्ष एकर जमीनीचें उत्पन्न सुमारें ३३ लक्ष मण धरलें तर त्याची किंमत ९० लक्ष होईल, व सर्व प्रांताचे उत्पन्नाची किंमत ४ कोटि होईल.

सदरहू सालीं सरकारास सर्व बाबी मिळून सर्व उत्पन्न ९०,२८,५९० रुपये झालें. यांत सुमारें पावणेबारा लक्ष रुपये गांवखर्चाचे व चौकीदार पट्टीचे आहेत. तसेच सुमारें साडेपांच लक्ष रुपये लोकल फंडाचे आहेत. ह्या दोन्ही रकमा जनरल रेव्हिन्यूंत धरल्यां जात नाहींत ह्मणून एकंदर ७३,१२,६३१ रुपयेच सरकारास उत्पन्न झाले असें ह्मटलें पाहिजे. यांत सुमारें ५३ लक्ष जमीनीचे सान्यापासून, साडेनऊ लक्ष अबकारीपासून, पावणेतीन लक्ष जंगलखात्यापासून, दीड लक्ष स्टांपापासून व साडेतीन लक्ष न्यायखात्यापासून झाले. बाकीचे, शाळाखातें, इमारत अथवा पब्लिक वर्क्सखातें, पोलिस खातें व जकात खातें वगैरे यांपासून उत्पन्न झाले. एकंदर सव्वाबासष्ट लक्ष एकर लागवडींत असलेल्या जमीनी पासून सुमारें ५३ लक्ष रुपये उत्पन्न झाले तेव्हां दर एकरास सरकार देणें सरासरीनें चवदा आण्याचे आंतच पडलें. अबकारीबद्दल साडेनऊ लक्ष रुपये आले त्यांत दीड लक्ष रुपये आफिणीबद्दल व बाकीचे दारूबद्दल. सर्व प्रांतांत दारू विकण्याचीं एकंदर २,०८७ दुकानें होतीं व अफू विकण्याचीं एकंदर ५०६ दुकानें होतीं. ह्या दोन्ही पदार्थांमुळें उत्पन्न झालेल्या पैशाचा बोजा प्रत्येक जिल्ह्यांतील लोकसंख्येचे व त्याबद्दल त्या जिल्ह्यांत रकम उत्पन्न झाल्याचे मानानें पाहिला असतां प्रत्येक मनुष्यावर किती बसला त्याचे प्रमाण येणेंप्रमाणें:—

उमरावती जिल्ह्यांत दर मनुष्यावर सरासरीनें आठ आणे, अकोला जिल्ह्यांत आठ आणे, इलिचपुर जिल्ह्यांत चवदा आणे, बुलढाणें जिल्ह्यांत पांच आणे, वणी जिल्ह्यांत सात आणे, आणि वाशीम जिल्ह्यांत दोन आणे यावरून दोन्ही पदार्थांचा उपयोग अमुक जिल्ह्यांतील लोक अधिक करतात असें अनुमान पक्केपणें करितां येतनाहीं, तरी पदार्थ विकण्य चे हक्काचा लिल्लाव घेण्याकरितां सर्व ठिकाणीं जिल्ह्याचे लोक सारखे झटत नाहींत किंवा प्रत्येक जिल्ह्यांत ह्या पदार्थांचे खपाप्रमाणें लिलावाची रकम उत्पन्न होते असें मानिलें पाहिजे. स्टांपाचें उत्पन्न सुमारें दीड लक्ष रुपये, व न्यायखात्यापासून सुमारें पावणेच्यार लक्ष रुपये व पब्लिक वर्क्स खात्यापासून सुमारें दोन लक्ष रुपये उत्पन्न झाले. याशिवाय बाकीची रकम दुसऱ्या किरकोळ खात्यांपासून उत्पन्न झाली. वर सांगितलेले एकंदर ९० लक्ष रुपये उत्पन्नाचें आणि प्रांतांतील लोक संख्येचें प्रमाण काढलें तर असें दिसून येतें कीं प्रत्येक मनुष्यापासून सरकारास सरासरीनें चार रुपये मिळकत झाली.

वऱ्हाड प्रांतांत चालू असलेल्या सर्व खात्यांचा खर्च सुमार एकवीस लाख रुपये दाखविला आहे. यांत लोकलफंड, गावखर्च आणि चौकीदाराचा खर्च दाखविला नाहीं. त्यांचा खर्च त्या त्या नावानें उत्पन्न केलेल्या फंडांतून होतो. हा सर्व खर्च जमेंतून वजा केला तर बाकी सुमार ५२ लाख रुपये रहातात. ह्यांचा खर्च रिपोर्टांत कोठेंही नमूद केलेला नाहीं. व या रकमेची कोठें कोण व्यवस्था लाविली याबद्दलही कांहीं आढळत नाहीं. बहुतकरून ही रकम हैदराबाद एथील लष्कराचे खर्चास जाऊन बाकी उरल्यास निजाम सरकारास मिळत असेल.

( पुढें चालू )

---

## सिव्हिल प्रोसिजरचें १७२ वें कलम रद्द आहे काय?

या महिन्याच्या ५वे तारखेच्या आह्मी आपले पत्रांत सिव्हिल प्रोसिजर ह्मणजे सन १८५९ चा आक्ट ८ याचें कलम १७२ याचे संबधानें अडगाव कोर्टाच्या न्यायाविरुद्ध कांहीं मजकूर लिहिला होता त्यावर आमचे धाकटे बंधू उर्दू अखबार कर्ते यांनीं टीका करून असें ह्मटलें आहे कीं "या कलमास वऱ्हाडांत सर्वांशीं हरताळ लागला गेला आहे" तेव्हां तो प्रकार खरा आहे कीं काय? व तसें असल्यास आह्मी आपली चूक सुधारणें अवश्य आहे असें समजून आह्मी या विषयीं शोध केला. तो सर्वांसही कळणें इष्ट जाणून आह्मी येथें घेतों

आमच्या बंधूनीं कलम १७६ असें लिहिलें आहे पण ती हस्तदोषाची चूक असेल, कारण त्या कलमाचा चालू प्रकरणांत कांहीं संबध नाहीं. साक्षीदारांच्या साक्षी कशा घ्याव्या याविषयींचें कलम १७२वें आहे. व तें फार मोठें आहे सबब आह्मी समग्र येथें दाखल करीत नाहीं. रा. नारायण मोरेश्वर केळकर यांचें दिवाणी सार संग्रह पुस्तक पृष्ठ १४० व १४१ याजवर तें कलम वाचून पहावें, सन १८५९ सालीं सिव्हिल प्रोसिजर कोड झाल्यावर सुमारें २ वर्षांनीं हिंदुस्थान सरकारानें तारीख ६ आगष्ट सन १८६१ चे हुकुमावरून तो कायदा अयोध्या प्रांतास लागू केला तेव्हां सरकारानें कित्येक कलमांविषयीं विशेष ठराव त्या कायद्यास जोडले. व ते वऱ्हाडासही लागू केले आहेत. त्यांतील नंबर ४ च्या विशेष ठरावांत असें लिहिलें आहे कीं "हरएक साक्षीदाराची साक्ष ज्या भाषेंत कोर्टाचें काम नेहमीं चालतें त्या भाषेंत लिहून घ्यावी." असे जे सिव्हिल प्रोसिजरचे १७२ वे कलमांत शब्द आहेत ते गाळाऊ केले आहेत व त्यांचे बदला नवीन भाग घातला आहे तो असा:—

चौकशी चालू असतांना न्यायाधिशानें आपले भाषेंत साक्षीदाराचे बोलण्यांतील मुख्य मुख्य भागाचें समजण्याजोगें टिपण करावें. तें टिपण सुबोध, पूर्ण, आणि पक्ष्यतशीर असावें. × × × प्रत्येक मुद्याचा मजकूर त्यांत असावा, पाल्हाळ नसावा. हें टिपण मुकदम्याचे कागदांत ठेवावें, व तो प्रोसिडिंगाचा भाग आहे असें समजावें. ज्या युरोपियन अधिकाऱ्याची देश भाषेंत परीक्षा पास झाली नाहीं त्याजपुढील चौकशींत साक्षीदारांच्या भाषेत पूर्णपणें ही जबानी लिहून घेत जावी.

हाच काय तो कलम १७२ यांतील फेरबदल 'याशिवाय साक्षीदाराचे समक्ष ती साक्ष वाचली पाहिजे व तींत चुक्या असल्या तर त्या नीट केल्या पाहिजेत इत्यादि जे मूळच्या कलमांत ठराव आहेत ते आजपावेतों रद्द झाले नाहींत. व जो पावेतों चांगले कायदे देशांत होतील तोंपावेतों ते ठराव रद्द होणार नाहींत असें आम्हास वाटतें. कारण साक्षीदारानें पाहिजे तें सांगावें व न्यायाधिशांनां पाहिजे तें लिहावें असें जोंपावेतों होत नाहीं तोंपावेतों साक्षीदाराचें बोलणें न्यायाधिशांनीं कसें लिहून घेतलें हें समजण्याची साक्षीदारास व पक्षकारास गरज आहे.

यावरून आमचे वाचकांस दिसून येईल कीं ५ वे तारखेच्या पत्रांतील आमच लेखाची इमारत कच्चे पायावर नव्हती. आंतां असें जरी क्षणभर घेऊन चाललों कीं, १७२ वे कलमास सर्वांशीं हरताळ लागली आहे व त्यामुळें जबानी वाचून दाखविण्याची गरज राहिली नाहीं तरी आमच्या त्या लेखाचें वळण नुसतें १७२ वे कलमावरच होतें असें नाहीं. न्यायाधिशानीं ज्या हकीकतीस खोट्या साक्षीचें रूप दिलें त्या हकीकती तशा नव्हत्या याजबद्दलचाही आमचा एक मोठा मुद्दा होता व तो अखंडित राहिला आहे.

अस्तु. मागें आम्ही लिहिल्याप्रमाणें त्याच त्या गोष्टींचें चर्वितचर्वण करावें अशी आमची इच्छा नाहीं व आमच्या बंधूनीं लिहिल्याप्रमाणें हें पोकळपांडित्य नसून, यांत कायद्याचा मोठा मुद्दा होता हें वाचकांस कळलें असेल.

आमच्या धाकट्या प्रिय बंधूनीं जी आह्मावर पुष्पवृष्टी केली तिचा आम्ही विषाद मानित नाहीं कारण त्यांचा तो लडिवाळपणा आहे.

---

## वऱ्हाड.

कर्नल नेंभार्ड साहेब कमिशनर हैदराबादेस गेले होते ते बुधवारीं परत येऊन उमरावतीकडे गेले.

हैदराबादचे रे[illegible] सर रिचर्ड मीड साहेब यांस १५ वे तारखेस नवाब विकरुल उमराव यांनीं एक ढोलेंजग मेजवानीं दिली. बेत फार उत्तम ठेविला होता. रोशनाई केली होती तींत एकंदर एक लक्ष दिवे लागले होते असें समजतें.

रेसिडेंट साहेबांनीं हैदराबाद एथील सर्व युरोपियन आफिसरास व सभ्य गृहस्थास असा हुकूम केला आहे कीं शहरांतील सरदार लोकांकडील हत्ती व इतर वा-

हें त्यानीं खासगी उपयोगाकरितां कधीं आणवू नयेत. तसेंच कोणास छावणींतून शहरांत जाणें असेल तर रेसिडेंट साहेबां ची पूर्वी परवानगी घेतल्यावांचून जाऊ नये.

रेसिडेंट साहेबांनीं रेलवे कंपनीचे एजंट मि. कांडर साहेब यांस असें लिहिलें आहे कीं हैदराबादेहून निघणाऱ्या मिक्स ट्रेनीची वेळ बदलून रात्रीची साडेदहाची करावी, ह्मणजे उतारू लोकांस पहाटेची मद्रास गाडी साधण्यास सोयवार पडेल.

हैदराबादचे नवीन नेमलेले फर्स्ट असिस्टंट रेसिडेंट मे. स्मीथ साहेब यांनीं गेल्या आठवड्यांत आपले कामचा मे. टवुडी साहेबांपासून च्यार्ज घेतला.

हैदराबाद एथें महामारीचा उपद्रव अजून चालू आहे. गेले आठवड्यांत एके दिवशीं १२ मनुष्यें मेलीं.

किऱ्येक डिपुटी कमिशनर साहेबांच्या बदल्या होण्याविषयीं वार्ता आहे. क्या० बुलक साहेब अकोल्याहून उमरावतीस जाणार, उमरावतीचे क्या. मेकंजी साहेब इलिचपुरास जाणार, इलिचपुरचे कर्नल बुशबी साहेब बुलढाण्यास जाणार, व बुलढाण्याचे मेजर हडलस्टन साहेब अकोल्यास येणार.

रावसाहेब नारायण भाई डायरेक्टर यांची स्वारी फिरत फिरत शिगावाकडे आली. आतां एथील शाळा बाळापूर पाहून पहिले तारखेच्या सुमारास अकोल्यास येतील.

उन्हाळा चांगला होऊं लागला. कचेऱ्या व शाळा सकाळच्या झाल्या. मोठ्या रस्त्यावर पाणी शिंपण्याची थोडी बहुत सुरवात झाली. पण सर्व रस्त्याविषयींही म्युनिसिप्यालिटी उदार होऊन पाणी शिंपण्याची लवकर तजवीज करील तर बरें होईल.

मेळघाट जंगलाचे सब असिस्टंट कान्सरवेटर यांस त्या डोंगरांत गुरें चारण्याचे पास देण्याचा अधिकार दिला.

क्या० के जे एल मेकंजी साहेब उम. तीचे आफिशिएटिंग डिपुटी कमिशनर यांस २५वे तारखे पासून किंवा ते लागू करतील त्या दुसऱ्या कोणत्या तारखे पासून तीन महिन्यांची हक्काची रजा मिळाली.

मि० ए इलियट साहेब थर्ड क्लास असिस्टंट कमिशनर विलायतेस फर्लो रजेवर गेले होते ते परत आले व आफिशिएटिंग सेकंड क्लास झाले, आणि मि० ए. जे. डनलप साहेब आफिशि० सेकंड क्लास होते ते आफि० थर्ड क्लास झाले.

खामगावचे म्युनिसिप्यालिटींत खालीं लिहिलेले गृहस्थांस मेंबर नेमिलें.

मि० सुंदर दामोदर स्कूल मास्तर
" बळवंत बापुजी वकील.

तसेच जुने मेंबरा पैकीं खालीं लिहिल्या गृहस्थांस पुन्हा कायम केलें.

मि० वामनराव वकील
,, पुरणमल साहू
,, गणेशदास भटार साहू

उमरावतीच्या म्युनिसिप्यालिटींत खालीं लिहिलेले गृहस्थ मेंबर नेमिलें.

मि० रामविलास साहू
,, बधिरुधन साहू
,, फत्ते अलीखान जाहागिदार
,, भिकाजी मेरवानजी क्याशर
,, एकनाथ लक्ष्मण वकील

केळापुरचे नायब तहशिलदार मि० गोविंद गंगाधर यांस थर्ड क्लास माजिस्त्रेट चे अधिकार दिले.

उमरावती जेल आस्पिटल कडील नेटिव डाक्टर गोविंदराव यांस २ महिन्यांची हक्काची रजा मिळाली.

**जमाखर्च.** वऱ्हाड प्रांताचा गेल्या एप्रिलपासून डिसेंबरपर्यंत नऊ महिन्याचा जमाखर्च रेसिडेन्सी आर्डरमध्यें छापून प्रसिद्ध झाला आहे त्याची गोळा बेरीज अशी:—

| जमा | रुपये |
|---|---|
| जमीनबाब.... .... .... | ७०३५६४ |
| फारिस्ट .... .... .... | १७'८६७ |
| अबकारी .... .... .... | ६७७२२६ |
| मीठ.... .... .... .......... | ० |
| स्टांप.... .... .... .... | ३०४३४८ |
| कायदा आणि न्याय | ८५०८९ |
| पोलिस .... .... .... | २८।८० |
| विद्याखातें .... .... .... | १२१२२ |
| व्याज .... .... .... .... | १९७५ |
| लष्कर .... .... .... .... | १७६२२ |
| पब्लिक वर्क्स .... .... .... | ४६७८ |
| पब्लिक वर्क्स स्टेटरेलवे | ८२२४८ |
| किरकोळ ........ .... .... | २६४६५ |
| | २११५३८० |

| खर्च | |
|---|---|
| जमीनबाब .... .... ... | ७९०५३७ |
| फारिस्ट .... ........ .. | ६२९६६ |
| स्टांप .......... .... .... | ७१६२ |
| रिफंड ....... ....... .... | ९३१२ |
| अडमिनिस्ट्रेशन ........ | १३७९४८ |
| इतर हलकीं खातीं ....... | १५७९९ |
| कायदा आणि न्याय | १८३४९८ |
| पोलिस ........... .... | ३८२९९२ |
| विद्या, शास्त्र कला ....१ | ७०२६५ |
| धर्म .......................... | ३७४१ |
| वैद्यक ...................... | ७३५३३ |
| स्टेशनरी ........... .... | १८०५८ |
| तहनाम्याबरहुकूम नेमणुका | ५७९३० |
| किरकोळ ................ | ३४१६० |
| सुपरअन्युयेशन .... .... | १२२९१ |
| लष्कर ................. | १९४६७७४ |
| पब्लिकवर्क्स .... ....... | ४०७३८४ |
| पाब्लिकवर्क्स स्टेटरेलवे | ९२८८९ |
| | ४३६७२३९ |

अकोल्याचें ट्रेनिंग कालेज बंद होणार अशी वार्ता निघाली आहे व अलीकडील दोन आठवड्याचे उर्दू अखबारांतही तसा मजकूर प्रसिध्ध झाला आहे पण तो निराधार दिसतो. ट्रेनिंग कालेज बंद होत नाहीं. व ८० रुपयांचे हिंदुस्थानी मास्तर लखनौहून मागविले आहेत ते लवकरच येतील असें समजतें.

" धर्मारण्यांतील ऋषिकुमार " अशा सहीचें कालचे उर्दूअकबारांत एक पत्र आहे. त्यांत एका युरोपियन गृहस्थांनीं कुत्र्याच्या सबबेनें एका हिंदूस चाबकानें मारिलें असें लिहिलें आहे. पण ती पुण्यभूमी कोणती? व कोणत्या दुष्ट नेटिवानें त्या गैरकाय पुण्यपुरुषाच्या क्रोधास उत्तेजित करून त्याच्या नाजुक हातास श्रम दिले तें समजत नाहीं! अरेरे! रागाच्या भिरीरींत बिच्यारे साहेब बुटाचा उपयोग करावयास अगदी विसरले!

जर कोणी वरिष्ठ अधिकारी नेटिवांस युरोपियनाकडून बसलेल्या माराची फारशी दाद घेत नाहींत तर त्यांनीं, तरी सवयीनें आपणास प्राप्त झालेला हक्क काय ह्मणून सोडावा !

अकोल्यांतील नामांकित सावकारांपैकी शेट मुकुंदलाल न्हनामल नांवाचे वृद्ध गृहस्थ गेले आठवड्यांत मरण पावले- त्यांस दम्याचा आजार होता. त्यांचे उत्तरक्रियेस त्यांचे चिरंजीव शेट बनशीलाल यानीं पुष्कळ खर्च व दान धर्म केला. त्यांच्या जातीचे पाच सातशें ब्राह्मण बाहेरगावाहून आले होते त्यांस एकेक रुपया त्यांनीं दक्षिणा दिली.

पुणेकर हिंदुनाटक मलकापुराकडून खामगावास आलेले थोड्या दिवसांत अकोल्यास येणार आहे.

## सिंक्लेर मेमोरियल फंड.

| | रु. |
|---|---|
| रा. यज्ञेश्वर दादाजी हे. मा. अडगाव | ५ |
| ,, मारुती शामराव अ. मा. अडगाव | २ |
| ,, त्रिंबक नरहर ए. अ. मा. अडगाव | १ |
| ,, अ. मा. अडगावे | १ |
| | ९ |
| मागील बेरीज | ६८६॥ |
| एकूण | ६९५॥ |

मागाहून आलेल्या नोटिसा.

गणपती वल्लद जानजी टेकले रहाणार मौजे दहीगाव तालुके अकोट जिल्हा अकोलें यांस सालीं सही करणार याजकडून नोटिस देण्यांत येते कीं, आमचे दुकानची बाकी तुह्मांकडे ९००८४ नऊशें रुपये चार आणे तुह्मी हिशेब करून दिपवाळीस रुजू करून दिली ती आम्ही मागत असतां अद्याप तुह्मी देत नाहीं याजकरितां ही नोटिस पावल्यापासून आठ दिवसांत व्याजासह व या नोटिशीचे खर्चासह रुपये चुकते करावे. या प्रमाणें न केल्यास पुढें तुह्मावर फिर्याद केली जाईल. मग फिर्यादीचे खर्चासुद्धां तुह्मास रुपये द्यावे लागतील. कळावें. तारीख २५ माहे मार्च सन १८७६ इसवी.

( सही ) मेघराज हनुमानबकस
दस्तुर बलदेव.

नोटिस

सोनी कोम शिवलाल हे उभयता व सरनामसिंग रहाणार अकोला या त्रिवर्गास नोटिस देण्यांत येते कीं माझी सुंदरा नांमे मुलगी ही तुमचा आमचा लोभ होता तोंवर कधीं तुमच्याकडे व कधीं मजकडे रहात असे. पुढें बेबनाव झाल्यावर मी तिला मागूं लागले तेव्हां दंडेलीस येऊन तिला येऊं दिलें नाहीं यास्तव आपली बहुत भांडणें झालीं. मी तिचें लग्न करण्याचा बेत करून सोयरीक देखील पाहिली पण त्याचाही सर्व बिघाड तुह्मी तिघानीं केला व आतां तिला तुह्मी कुमार्गास लावण्याचा बेत करतात असें मला कळतें तर ही नोटिस पावल्यापासून ८ दिवसाचे आंत माझ्या मुलीस माझे ताब्यांत देणें. नाहीं तर मी फिर्याद करून मुलगी ताब्यांत घेईन. फिर्यादीचा व या नोटिशीचा खर्च तुह्मास द्यावा लागेल कळावें तारीख २५ मार्च सन १८७६ इसवी.

( सही ) मुना हलवाईण निशाणी हातची बांगडी.

## वर्तमानसार

जुनागड प्रांतांत महामारीचा उपद्रव सुरू झाला आहे. काठेवाडचे पोलिटीकल एजंट मि. पील यांनीं स्वच्छते विषयीं वगैरे बंदोबस्त चांगला ठेविला आहे.

मिस मेरी कार्पेंटर बाई हिंदुस्थानांतून आपला सर्व प्रवास सोपवून मुंबईस आल्या. आतां लवकरच विलायतेस जातील.

मि० बमनजी सोराबजी गायकवाड सरकारचे इंजिनियर यानीं मुंबईस आपली बायको आवबाई इचा विवाह संबंधाचा हक्क तिचे गैर चाली करितां रद्द करण्या विषयीं दावा केला होता त्याप्रमाणें ती जारिणी आहे असें ठरून तिचा हक्क रद्द [illegible] ला. व तिचा सोबती बमन[illegible] यानें दाव्याचा सर्वखर्च [illegible] केलें आ[illegible] गें एका प्रसंगी या ब[illegible] च फिर्याद लाविली होती पण ती चांगल्या रीतीनें शाबीद न झाल्यामुळें त्यावर च बायकोनें अन्न वस्त्राचा दावा करून दरमहा १५ रुपये मिळण्याचा [illegible] मिळविलेला होता.

रिविन्यू जुरिस् डिक्शन बिलाची तिसरी वाचणी होऊन सिलेक्ट कमिटीचा रिपोर्ट झाला. आतां मंगळवारीं ते पास होईल.

मद्रास इलाख्यांत गेल्या डिसेंबर अखेरच्या तिमाहित वाघानीं व चित्यानीं जनावरें मारिलीं त्यांचा तपशील:—

बैल५८३, गाई६८६, गोऱ्हे२[illegible] हेले१६९, शेळ्या२४८, बकरे२३[illegible] पंडे१८, गाढव५, कुत्री७६, आ[illegible] ३१ मिळून २२९७ [illegible] मारलीं.

प्रिन्स आफ वेल्स बडोद्यास गेले व परत आले त्या वेळच्या आगगाडीच्या अव्यवस्थेच्या संबंधानें जो सरकारी पत्रव्यवहार टाइम्समध्यें छापला गेला. त्याविषयीं एक पत्रकर्त्ता म्हणतो कीं, सरकारानें ती बातमी कशी फुटली याविषयीं बहुत शोध केला, क्लार्क लोकांस वेगवेगळे फोडून त्यांच्या अंतस्थ जबान्या घेतल्या, त्यांस अंधारकोठडींत बसवून त्यांचीं तोंडें दिसण्यापुरता मात्र कंदीचा उजेड ठेवून त्यांची मोठ्या कसोटीनें तपासणी केली पण काडीमात्र सुगावा लागला नाहीं. असें ह्मणतात कीं एकासिक्रेटरीनी मेस्मेरिझमचा प्रयोग साक्षिदारावर करण्याविषयीं विच्यारिलें होतें पण त्यास तसें करू दिलें नाहीं.

प्रिन्स आफ वेल्स एडन बंदरापर्यंत सुखरूप पोंचून तेथून २०वे तारखेस रवाना झाले असें कळतें. एडन येथें ६ तास मुक्काम केला पण जाहाजाखालीं उतरले नाहींत.

प्रिन्स आफ वेल्स यांनीं मुंबई मुकामीं परत जाण्याचें प्रसंगीं जाहाजांत बसतांना व्हाईसराय यांस आभारपूर्वक पत्र लिहिलें आहे त्यांत हिंदुस्थान पाहून राज्यव्यवस्था मनांत आणून व आदरातिथ्य सेवन करून अतिशय संतुष्ट झालों असें लिहिलें आहे.

---

## नोटिसा.

---

रा. नरभट बिन विठ्ठलभट जोशी मुकाम बाभळी तालुके दर्यापुर यांस खालीं सही करणाराकडून नोटिस देण्यांत येतें कीं तुह्मी पळसो येथें आपले जातीचे लग्नाचे प्रसंगीं आमचे पश्चात् जातीच्या मंडळीस तुह्मी ह्मणाला कीं रामभट बिन चिंतामणभट जोशी पेठ बाळापुरकर याजबरोबर जो अन्नव्यवहार करील त्यास गायचे निरोस हात लावण्याची शपथ असे. हा मजकूर मला समजल्यावरून मी या नोटिशीनें तुह्माला कळवितों कीं तुह्माला अशी शपथ घालून माझा अपमान करण्याचें कारण काय याचा जबाब नोटिस पहातांच द्यावा. न द्याल तर तुह्मावर फौ... फिर्याद करून अब्रूचा ... आजपर्यंत अशी शपथ ... नाहीं ... कळावें तारीख २१ माहे मार्च सन १८७६ इसवी.

(सही) रामभट बिन चिंतामण भट जोशी पेठ बाळापुर दस्तुर खुद.

---

नोटिस

कुकाजी वल्लद बिठोबा पांडव रहाणार मौजे काजीखेडे तालुके बाळापुर यास अंबु मर्द कुकाजी पांडव इजकडून नोटिस देण्यांत येते कीं, तुझ्याशीं माझें लग्न झालें ... सुमार २९ वर्षें झालीं. लग्नांत मी ... वर्षांची होते. पुढें मला कळूं ... स १२ । १९ वर्षें झालीं. तूं ... घरीं नेऊन वागवीत नाहींस ... नें तीन वेळां मला तुझे घरीं नेऊन घातले असतां हाणमार करून व भलभलतीं तुफानें घेऊन मला बापाचे घरीं परत पोंचाविलेस व तूं मदतबाज आहेस यावरून तुला माझी गरज नाहीं असें दिसतें. माझे बापानें आंजवर मला पोसलें त्याचें पोटखर्चाबद्दल दरसाल ४० रुपये प्रमाणें रुपये ६०० तुह्मी नोटिस पावतांच पाठऊन द्यावे. व पुढें तुझे मनांत मला सुखासमाधानानें वागवून माझा जन रीतीप्रमाणें संसार होऊं द्यावा असें असेल तर मला घेऊन जावें व चांगले प्रकारें वागवावें मी येण्यास सिद्ध आहे. आणि जर करतां तुला हें कबूल नसेल तर ही नोटिस पावल्यापासून ८ दिवसांत लग्नाची सोडचिठी द्यावी ह्मणजे मी गंधर्वाचा दुसरा घरठाव पाहीन, सोडचिठी न दिलीत तर १९ दिवस तुह्मी वाट पाहून कायदेशीर रीतीनें सरकारांतून तुझा हक्क रद्द करवीन व मी दुसरा घरठाव करीन मग तुझें कांहीं चालणार नाहीं न रुपयांबद्दल तुजवर दिवाणींत दावा केला जाईल हें पक्कें समजावें. कळावें

तारीख २३ माहे मार्च सन १८७६ इसवी.

(सही) अंबू मर्द कुकाजी पांडव इचे हातची निशाणी बांगडी.

---

नोटिस.

मेहेरबान सुजायत अल्ली वल्लद असात अल्ली रहाणार मौजे दापुरी प्रगणे हिवरखेड तालुके मोर्शी यांस खालीं सही करणाराकडून देण्यांत येतें कीं, आसातअल्ली यार्णी तुमची बहीण नामें अमीर इजला माझे भावास देऊन आपले रिवाजाप्रमाणें रुसूम चार जातीवाल्यांसमक्ष तुमचे हातून होऊन सोयरीक पक्की केली. त्याप्रमाणें पुढें आह्मी लग्नाचा नेम करण्यास आलों असतां लग्न करण्यास तुह्मी नाकबूल झालां यास्तव तुह्मांस ह्या नोटिशीनें कळविण्यांत येतें कीं, ही नोटिस पावल्यापासून एक महिन्याचे आंत तुमचे बहिणीचे लग्नाचा नेम सोयरीक झाल्याप्रमाणें आमचे भावाशीं लग्न करून द्यावें. तसें तुह्मी न केल्यास आह्मी दुसरी सोयरीक करून लग्न करू व तुह्मापासून ह्या सोयरिकीचा झालेला खर्च व दुसरी सोयरीक करण्यास जो खर्च लागेल तो आणि या नोटिशीचा खर्च असें एकंदर रीतीप्रमाणें भरून घेण्यांत येईल. कळावें. तारीख ८ माहे मार्च सन १८७६ इसवी.

(सही) शेखरहिमान वल्लद शेखअमीर मक्तेदार कसबे हिवरखेड निशाणी खुद.

---

नोटिस.

हरी वल्लद नवलाजी पाटील मौजे निंभोरें बुजरूख प्रगणें पातुरडें तालुके अकोट यांस खालीं सही करणार याजकडून देण्यांत येतें की, तुह्मी आह्मावर खोटेपणाची नोटिस दिली. त्यांतील मजकूर असा कीं, जानजी वल्लद इरभानजी जलमकर वस्ती मौजे निंभोरें खुर्द याजबद्दल आठा दिवसाचे कराराचा आकडा रुपये ९०चा दिला. रुपये द्या ह्मणून लिहिता व आणखी तुमचेकडे आमची बाकी निघत आहे असें लिहिता तर हें लिहिणें तुह्मास योग्य नाहीं. हल्लीं माझा मजकूर जाहिर करितों कीं, तुह्माकडे माझा कापूस चार खंडी दर ३६ हल्लीं चालू रुपये प्रमाणें १४४ - एकशें चव्वेचाळीसचा व कापडाबद्दल रुपये २६॥ एकूण रुपये १७०॥ तुह्माकडून घेणें आहे त्याजबद्दल आकडा ९० रुपयांचा चिमणाजी जळमकर यांस लिहिला तो वजा जातां बाकी १२०॥ रुपये व त्याचे व्याजासुद्धां रुपये पंधरा दिवसांचे आंत दाखल करावें. नाहीं तर रीतीप्रमाणें तजवीज केली जाईल व कपाशी तुह्मी आह्मास लावल्याबद्दल व वसूल पावल्याबद्दल हिशेब तुमच्या हातचा आह्माजवळ आहे पुढें तुह्मी तक्रार कराल तर ती चालणार नाहीं याजकरितां तुह्मास पूर्वीं सुचविलें आहे. खालीं खर्च कोणा सही न बसतां तुह्मी आमची रकम आह्मापाशीं दाखल करावी. ही नोटिस दिली सही. तारीख १९ मार्च १८७६ इसवी.

(सही) रामदेव शोडू मारवाडी पांडे दुकान दहिगाव तालुके अकोट निशाणी खुद

---

नोटिस.

पुंनाजी वल्लद शामसिंग पारधी रहाणार पळसी प्रगणें जामोद तालुके जळगाव जिल्हे अकोले यास भवानीदीन बंदेदीन कलाल मक्तेदार रहाणार पातुरडा याजकडून देण्यांत येते कीं, तुह्मी मौजे टुणकी जहागीर तालुके जळगाव एथील कलालीचा मक्ता सन १८७६।७७ सालचा रुपये १७०१ सतराशें एकास तुह्मी मागितला असून फेब्रुवारी महिन्याचे आंत पेशगी चवथाई रकम देण्याचें कबूल केलें असून त्याप्रमाणें पटविली नाहीं. ह्मणून दोन वेळां तुह्मास लेखी कळविलें तरी जबाब पाठविला नाहीं व पेशगीही पटविली नाहीं करितां ही नोटिस दिली आहे तर तारीख २८ मार्च सन मजकूरचे आंत चवथाई रकम दाखल करावी. नाहीं तर फेरलिलाव करून मक्ता दुसऱ्यास दिला जाईल. तनजी रकम कमी पडेल ती व या नोटिशीचा खर्च अशी एकंदर रकम दिवाणी कोर्टांत दावा करून घेतली जाईल. कळावें. तारीख २३ माहे मार्च सन १८७६ इसवी.

(सही) भवानीदीन वल्लद बंदेदीन कलाल मक्तेदार दस्तुर खुद.

---

नोटिस

मेहेरबान टिकाराम वल्लद नरसिंग बोवा नाटे पाटील रहाणार मौजे जळगाव नाऱ्याचें प्रगणें अकोट यास खालीं सही करणार शेख नजीम वल्लद रुस्तम रहाणार कसबे हिवरखेड प्रगणे अडगाव याजकडून नोटिस देण्यांत येतें कीं तुह्मी कसबे मजकुरीं जातीनें येऊन आमशी चुन्याचा सवदा ६० खंड्याचा केला दरखंडी ३। रुपये प्रमाणें एकंदर आकार १९९ रुपये झाले त्यापैकीं १ रुपया त्याचवेळेस इसार दिला आणि असें बोलणें ठरलें कीं मी आतां दुसऱ्याचा माल घेणार नाहीं कदाचित जर घेतला तर दरखंडीस ६ रुपये प्रमाणें तुह्मास दाम भरून देईन असें बोलणें झाल्यावर दुसरे दिवशीं एक गाडी माल चुन्याचा घेऊन गेलों त्याउपर तुह्मी आज पावेतों माल नेण्यास आले नाहीं. मध्यंतरी एक वेळ माणूस पाठविला होता नंतर मी जातीनें आलों त्या वेळेस आपण असें बोलले कीं आतां दिवस खेती वाडीचे आहेत आमचे रिकामपण नाहीं रिकामपण झाल्यावर आह्मी माल नेण्यास येऊं आणि तुमचे रुपये तुह्मास देऊं असें असतां अद्याप पावेतों तुह्मी आले नाहीं हें फार ताजुबची गोष्ट आहे आणि रुपयेही पाठविले नाहींत करितां तुह्मास नोटिस दिली आहे तर ही नोटिस पावल्यापासून ८ दिवसांचे आंत रुपयाची आदाई करून तुह्मी आपला माल घेऊन जावा जर असें तुह्माकडून न झाल्यास आमचें जें नुकसान होईल तें व सदर्हू बोलण्याचा नेम ठरल्याप्रमाणें दाम व सावकार लोकांचे व्याजासुद्धां व नोटिशीचा खर्च असें दिवाणी मार्गानें कोर्ट खर्चासुद्धां भरून घेतला जाईल ही नोटिस पावल्याबद्दल लेखी उत्तर कळवावें. कळावें तारीख १६ माहे मार्च सन १८७६ इसवी

(सही) शेख नजीम वल्लद रुस्तम रहाणार हिवरखेड दस्तुर खुद

---

नोटिस

तुळशी मर्द जयराम गुरव रहाणार नांदुरें बाजाराचें प्रगणें मलकापुर तालुके मजकूर जिल्हे बुलढाणें इला जयराम वल्लद सिताराम गुरव रहाणार मौजे जनुनें तालुके खामगाव याजकडून नोटिशीचें उत्तर देण्यांत येतें कीं तूं तारीख ५ मार्च सन १८७६ इसवीचे वऱ्हाडसमाचारांतून आह्मास खोटी नोटिस दिली ती अशी कीं तूं ह्मणते फारकती देतों ह्मणून मी बोलून गेलों, तसेंच तूं आठ वर्षांचा खर्च मागतेस, मी फारकती देण्याचें कधींच बोललों नाहीं व तुला माझे एथून जाऊन ८ वर्षेंही झालीं नाहींत. तुला माझे एथून जाऊन ९ वर्षे झालीं त्यावर मी दहा पांच वेळ तुला न्यावयास ३ गावचे पंच घेऊन आलों त्या वेळेस तुझ्या आईचें ह्मणणें पडलें कीं, हा ही माझा एक मुलगाच आहे मी पाठवीत नाहीं तेव्हां मी निरुपाय होऊन गेल्या वैशाखांत मी आपलें लग्न केलें. आतांही तुला येणें असल्यास १५ दिवसांत माझे घरीं येऊन नांदावें तुला खर्च किंवा फारकत कधींही मिळणार नाहीं शिवाय तूं जाते वेळेस अंगावरचे डागिने समागमे घेऊन गेलीस ते अजमासें ३०० रुपयाचे आहेत. वर लिहिलेल्या मुदतींत तूं आमचे घरीं आली नाहींस तर सदर्हू डागिण्याबद्दल तुझ्या आईवर फिर्याद केली जाईल. हें खूप समजावें कळावें तारीख २२ मार्च सन १८७६ इसवी.

(सही) जयराम वल्लद सिताराम गुरव निशाणी खुद हातची

---

हें पत्र अकोलें एथें खंडेराव बाळाजी फडके यांचे वऱ्हाडसमाचार छा. छा. म.